# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १६, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

**प्रश्नांची एकूण संख्या - ६७**

### रेठरे धरण (ता.वाळवा, जि.सांगली) या ठिकाणी नवीन उपकेंद्र उभारण्याबाबत

**(१) * ८८६१५ श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेठरे धरण (ता.वाळवा, जि.सांगली) या ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण मंडळामार्फत नवीन उपकेंद्राला मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपकेंद्राच्या उभारणीच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, तसेच विलंबास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) पायाभूत आराखडा-२ योजनेअंतर्गत सांगली जिल्हा वाळवा तालुक्यातील रेठरे धरण येथे ३३/११ केव्हीचे उपकेंद्र मंजूर आहे.

(२) सदर उपकेंद्राचे काम व दोन ११ केव्ही कृषी वाहिन्यांचे काम पुर्ण झाले असून ११ केव्ही रेठरे धरण गावठाण वाहिनीचे काम स्थानिक रहिवाशांनी वारंवार अडथळा आणल्यामुळे प्रलंबित होते. माहे जुलै २०१७ पहिल्या आठवडया मध्ये सदरचा अडथळा दूर झाला असून गावठाण वाहिनीचे काम प्रगतीपथावर आहे. या उपकेंद्रा करिता नवीन ०.४२ कि.मी. च्या ३३ केव्ही टॅप वाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. जुन्या ८ कि.मी. च्या ३३ केव्ही वीज वाहिनीचे सदोष डिस्क व पीन इन्सुलेटर बदलण्याचे काम सुरु आहे. रेठरे धरण उपकेंद्र ऑगस्ट, २०१७ पर्यंत कार्यान्वित होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वडाळा पूर्व (मुंबई) येथील गणेशनगर दुधवाला गल्ली येथे हायटेन्शन वायरचा झालेला स्फोट

**(२) * ८५९१६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा पूर्व ( मुंबई) येथील गणेशनगर दुधवाला गल्ली येथे हायटेन्शन वायरचा स्फोट होवून तीन घरांचे पूर्णत: नुकसान झाले असून त्यात एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नूसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच जखमींना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) गणेश नगर, वडाळा (पूर्व) येथे दि. २४.४.२०१७ रोजी रात्री १ वाजताच्या सुमारास टाटा पॉवर कंपनीची ईएचव्ही लाईन ट्रीप होऊन फ्लॅश ओव्हर झाल्यामुळे तीन घराचे नुकसान झाले आहे. सदर घटनेची चौकशी दि. २६.४.२०१७ रोजी विद्युत निरीक्षक, मुंबई निरीक्षण विभाग, मुंबई या कार्यालयामार्फत करण्यात आली. त्यांच्या माहितीनुसार श्री. सुनिल शंकर थळे, गणेश नगर, सॉल्ट पॅन रोड, ॲन्टॉप हिल, मुंबई यांनी स्वत:च्या घरावर अनधिकृतपणे एक मजला बांधलेला आहे. त्यामुळे त्यांच्या घरावरून जाणाऱ्या टाटा पॉवर कंपनीच्या ११० केव्ही ट्रान्समिशन लाईनचे अंतर कमी झाले. श्री. एजाज अनिस अन्सारी चोरी करण्याच्या उद्देशाने दि. २४.४.२०१७ रोजी मध्यरात्री १.०० च्या सुमारास श्री. सुनिल शंकर थळे यांच्या घराच्या छतावर चढले असता घरावरून जाणाऱ्या टाटा पॉवर कंपनी लि. च्या ट्रान्समिशन लाईनच्या अर्किंग झोन (Arcing Zone) मध्ये आल्याने फ्लॅश ओव्हर होऊन सदर अपघात झाला. त्यामध्ये श्री. अन्सारी स्वत: भाजले गेले व आगीच्या ज्वालांमुळे घराच्या पत्र्याचे छत कोसळून घरामध्ये झोपलेली इतर चार माणसेही भाजली गेली. भाजलेल्या सर्व लोकांना के. ई. एम. रुग्णालयात नेण्यात आले. त्यापैकी श्री. एजाज अन्सारी यांचा दि. २६.४.१७ रोजी मृत्यु झाला असून इतर चार लोकांना उपचाराअंती घरी सोडण्यात आले आहे.

विद्युत निरीक्षक, मुंबई निरीक्षण विभाग, मुंबई या कार्यालयाने दि. २८.४.२०१७ च्या पत्रान्वये घरमालक श्री. सुनिल शंकर थळे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तिथवली-दिगशी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याबाबत

**(३) * ८७६५६ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिथवली-दिगशी (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने तालुक्यातील राजकीय पक्षाच्या शिष्टमंडळाने दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास येथील वीज वितरण कार्यालयातील अधिका-यांची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांना निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या गावातील दिगशी पाष्टेवाडी शाळेनजीक वीजवाहिन्या जमिनीपासून काही अंतरावर अधांतरी असल्याने कधीही शॉर्टसर्कीट होऊन जिवितहानी होण्याची शक्यता असल्याने या प्रकरणी त्वरित उपाययोजना करण्याबाबत सदरहू निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ मधील नमूद मागण्यांबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दि. २८.०४.२०१७ रोजी स्थानिक ग्रामस्थांनी महावितरणच्या वैभववाडी येथील कार्यालयात वर्तमान पत्रात आलेल्या बातमीचे कात्रण सादर केले होते.

(२) ही बाब सदर बातमीमध्ये नमूद केलेली आहे.

(३) मौजे दिगशी पाष्टेवाडी येथे महावितरण कंपनीमार्फत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली आहे. पंडीत दिनदयाळ ग्रामज्योती योजनेअंतर्गत पाष्टेवाडीसाठी नवीन ६३ केव्हीए क्षमतेचे रोहित्र प्रस्तावित केले आहे. सदर कामाचे कंत्राट देण्यात आले असून सदरचे काम त्यांच्याकडून लवकरच पूर्ण करुन घेण्यात येणार आहे. तसेच पाष्टेवाडी येथील शाळेच्या आवारातून गेलेल्या वीज वाहिन्यांची देखभाल व दुरुस्ती करुन त्या पुन:श्च ओढून

घेण्यात आल्या आहेत. सदर शाळेच्या आवारातून गेलेल्या वीज वाहिन्या स्थलांतरीत करण्याचे काम सन २०१६-१७ मध्ये डीपीडीसी या योजनेमध्ये मंजूर असून सदर कामाचे कंत्राट देण्यात आले असून ते काम माहे सप्टेंबर-२०१७ अखेर पर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर येथील औद्योगिक क्षेत्रातील भूखंड वाटपाबाबत

**(४) * ९२८१४ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ प्रादेशिक कार्यालय,लातूर अंतर्गत अतिरिक्त औद्योगिक क्षेत्रात लातूर प्रादेशिक कार्यालयातील भूखंड वाटप समितीने सन २००६ पर्यंत मागणी केलेल्या सुमारे १२५ उद्योजकांकडून सन २०१४-१५ मध्ये भूखंड मंजुरीसाठी अनामत रक्कम भरून घेतली आहे व त्यापैकी ७४ उद्योजकांना भूखंडाचे अद्याप वाटप झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर अनामत रक्कम भरलेल्या उद्योजकांनी दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी मा. उद्योग राज्यमंत्री यांच्याकडे व दिनांक १२ मे, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सदर उद्योजकांना रेखांकन नकाशा मंजूर करून तात्काळ भूखंड वाटप करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डी.सी.मुंबई यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उद्योजकांना भूखंड वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर उद्योजकांना भूखंड वाटप करण्यास शासनास किती कालावधी लागेल ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.

शासनाने या विषयाबाबत चौकशी लवकर पुर्ण करुन महामंडळाने अर्जदारांची पात्रता तपासून भूखंड वितरणाबाबत योग्य निर्णय घेणेबाबत आदेशित केलेले आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाने साहित्य खरेदी न केल्याने निधीचा विनियोग न झाल्याबाबत

**(५) * ८८६१७ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून अपंगांसाठी ३ टक्के, महिला व बालकल्याणासाठी १० टक्के तर समाजकल्याण विभागासाठी २० टक्के निधीची तरतूद केलेली असतांनाही समाजकल्याण विभागाने साहित्य खरेदी न केल्याने मागील तीन वर्षापासून सुमारे ३ कोटींचा निधी पडून असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डीबीटीमुळे (डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर) यवतमाळ जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाची सुमारे सव्वापाच कोटींची साहित्य खरेदी बाधीत झाली असल्याने सेस फंडातून तरतूद करूनही हा निधी शिल्लक राहिला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे सदरहू रक्कम खर्च करण्यासाठी दोन हजार लाभार्थी तीन वर्षानंतर अपात्र ठरून नव्याने प्रस्ताव मागवण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) सन २०१६-१७ साठी लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली असून, वैयक्तिक लाभांच्या योजनेचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात हस्तांतरण करावयाचे आहेत. तथापि लाभार्थ्यांनी साहित्य खरेदी करुन त्या संदर्भातील प्रस्ताव सादर न केल्याने लाभार्थ्यांच्या खात्यात सदर रक्कम अद्याप जमा करता आलेली नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील तोट्यात असलेल्या जिल्हा मध्यवर्ती बँका राज्य शिखर बँकेत विलीन करण्याबाबत

**(६) * ९०८२२ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी ११ बँका तोट्यात असून, त्यापैकी सोलापूर, बीड, धाराशीव, नांदेड, जालना, परभणी, बुलढाणा, वर्धा आणि नागपूर येथील बँकाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने उक्त बँकांचे शिखर बँकेत विलीनीकरण करण्याची बाब सरकारच्या विचाराधीन असल्याची माहिती दिनांक २९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हा मध्यवर्ती बँकांना किती आर्थिक तोटा झाला आहे व त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास,याप्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच तोट्यातील बँकांचे शिखर बँकेत विलीनीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय.

(२) उक्त जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांपैकी दि.३१-०३-२०१७ अखेर तोटा झालेल्या बँकांची माहिती खालील प्रमाणे-

सोलापूर - तोटा रु.६१.५६ कोटी

उस्मानाबाद- तोटा रु.३०.५२ कोटी

नांदेड - तोटा रु.१३२.६३ कोटी

जालना - तोटा रु.४५ कोटी

बुलढाणा - तोटा रु.२४७.४७ कोटी

वर्धा - तोटा रु.२८०.८६ कोटी

नागपूर - तोटा रु.२१६.११ कोटी

उक्त बँकांना तोटा होण्याची सर्वसाधारण कारणे खालील प्रमाणे आहेत.

(१) वसुल पात्र कर्जाची वसुली न होणे.

(२) व्यवसाय विस्तार मर्यादित असणे,

(३) उत्पन्नक्षम मालमत्तेचा/गुंतवणूकीचा अभाव असणे,

(४) व्यवस्थापकीय खर्चाचे प्रमाण अधिक असणे,

(५) कर्ज धोरण तसेच गुंतवणूक धोरण व्यवसायभिमूख नसणे,

(६) प्रशिक्षित तसेच उच्च शिक्षित अधिका-यांची कमतरता असणे

(३) सदर बँकांपैकी सोलापूर व नागपूर या बँकांना झालेल्या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये प्राधिकृत अधिका-यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहराला लागणाऱ्या एकूण विजेपैकी निम्मी वीज सौर उर्जेतून उपलब्ध करण्याबाबत

**(७) * ८४९५६ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराला लागणाऱ्या एकूण ३.५ ते ३.७५ गिगावॅट विजेपैकी १.७२ गिगावॅट म्हणजेच निम्मी वीज सौर उर्जेतून उपलब्ध होऊ शकेल अशा प्रकारचा निष्कर्ष आयआयटी मुंबई व ओआरएफ यांच्यासह एकूण ५ संस्थांनी केलेल्या सौर उर्जेच्या अभ्यासातून दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय सौरऊर्जा योजनेअंतर्गत, १०० गिगावॅट हे महत्वाकांक्षी उद्दिष्ट ठरविण्यात आले असून, त्यापैकी ४० गिगावॅटस् सौरऊर्जा ही छतावरील ऊर्जा संकलन विकेंद्रीत प्रकल्पाद्वारे निर्माण होणे अपेक्षित असल्याने सदरहू प्रकल्प मुंबईतील इमारतींवर राबवून, ५० टक्के वीज उत्पादन करण्याच्या दृष्टीने, राज्य शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) अद्याप, शासनाने कार्यवाही केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर प्रकल्प मुंबईतील इमारतींवर किती कालावधीत राबविण्यात येणार आहे व त्याकरीता शासनाने किती रुपये निधीची तरतूद केली वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) टाटा पॉवर व रिलायंस एनर्जी यांच्या निर्देशानुसार आयआयटी, मुंबई व ओआरएफ व इतर संस्था यांनी केलेल्या अभ्यासातून मुंबईतील इमारतींच्या छतावर सौर ऊर्जा संकलन विकेंद्रित प्रकल्पातून एकूण १.७२ गिगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होऊ शकेल असा निष्कर्ष काढून त्यांचा अहवाल दिनांक ११/४/२०१७ रोजी प्रसिध्द केला आहे. तथापि, सदर अहवाल अद्यापि शासनास प्राप्त झालेला नाही.

(२), (३) व (४) राष्ट्रीय सौर ऊर्जा योजनेतर्गत सन २०२२ पर्यंत एकूण १७५ गिगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे महत्वाकांक्षी उदिष्ट ठरविण्यात आले आहे. राष्ट्रीय सौर ऊर्जा योजनेतर्गत छतावरील ऊर्जा संकलन विकेंद्रित प्रकल्पाव्दारे सौर ऊर्जा निर्मिती करणे याचाही समावेश आहे.

शासनाने राज्याचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत) स्त्रोतापासून विकेंद्रित पारेषण विरहित ऊर्जा निर्मितीचे एकत्रित धोरण ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी प्रसिध्द केले आहे. सदर धोरणानुसार राज्यातील शासकीय, निमशासकीय स्थानिक स्वराज्य संस्था यांची कार्यालये व अनुदानित शैक्षणिक संस्था तसेच खाजगी इमारतीवर पुढील ५ वर्षामध्ये एकूण १५० मे.वॅ.क्षमतेचे इमारतीचे छत (रूफटॉप) व जमिनीवर आस्थापित होणारे सौर विद्युत संच आस्थापित करण्याचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे. इमारतीचे छत (रूफटॉप) व जमिनीवर आस्थापित होणारे सौर विद्युत संच आस्थापित करण्याठी १३ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून पुढील ५ वर्षासाठी दरवर्षी रू. २० कोटी अशी एकूण १०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी दिनांक २३/२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये रू. १२ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

## सोलापूर, सांगली, बुलढाणा जिल्हा बँकांची साखर कारखाने व सुतगिरण्यांकडे असलेली थकबाकी वसूल करण्याबाबत

**(८) * ९२६०४ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर, सांगली,बुलढाणा जिल्हा बँकांची साखर कारखाने व सुतगिरणीकडे सुमारे ५२० कोटी ५८ लाखांची थकबाकी असल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने थकित रक्कम त्वरीत वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.
सोलापूर, सांगली व बुलढाणा या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी साखर कारखाने व सूत गिरण्यांना दिलेल्या कर्जाची थकबाकी रू. ९०७.५९ कोटी (व्याजासह) इतकी आहे.
(२) होय.
(३) संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत येणे कर्जाच्या वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये मा.सहकार न्यायालयामध्ये दावे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सरफेसी / सेक्यूरीटायझेशन कायद्यांतर्गत वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील नागनाथ कनिष्ठ महाविद्यालयात शिष्यवृत्तीत झालेला गैरव्यवहार

**(९) * ९२३१५ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील नागनाथ कनिष्ठ महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मिळणाऱ्या शिष्यवृत्तीत गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसुली केल्याबाबत वरिष्ठांकडे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्ह्यात दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत दलित वस्त्यांचा समावेश केला जात नसल्याबाबत

**(१०) * ९३७२१ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यात दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हा परिषदेला दरवर्षी कोट्यावधी रुपये मिळत असूनही या योजनेत बृहत आराखड्यानुसार दलित वस्त्यांचा समावेश केला जात नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे अनेक दलित वस्त्यांना विकास कामांपासून वंचित ठेवण्यात आले असून ज्या वस्त्यांमध्ये दलित वस्त्यांची संख्या नगण्य आहे अशा वस्त्यांना मुबलक निधी दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत दोषीं आढळणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच दलित वस्त्यांचा बृहत आराखडयानुसार समावेश करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही.

(२) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेचा औरंगाबाद जिल्हयाचा सन २०१३ ते २०१८ या कालावधीचा बृहत आराखडा मंजूर असून, या बृहत आराखडयात ज्या वस्त्यांचा समावेश आहे त्या वस्त्यांसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात निधी वितरीत करुन कामे करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेचा औरंगाबाद जिल्हयाचा सन २०१८ ते २०२३ या कालावधीचा नविन बृहत आराखडा मंजूर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आदिवासी विकास विभागातील कोट्यावधी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात

**(११) * ८४८९३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर),**

**श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागातील कोट्यावधी रुपयांच्या झालेल्या गैरव्यवहारासंदर्भात चौकशी करण्याकरिता माजी न्यायमूर्ती एम.जी.गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालात सन २००४-०५ ते २००९-१० या कालावधीत नाशिक, ठाणे, नागपूर व अमरावती आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या आदिवासी विभागात केंद्र सरकारकडून येणाऱ्या अर्थसहाय्यता निधीत कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील १० जिल्ह्यातील प्रादेशिक व्यवस्थापन कार्यालयांनी (आरएमओ) ३५०७७ लाभार्थ्यांना डिझेल इंजिनाचे वाटप करायचे असताना केवळ २७३१९ लाभार्थ्यांनाच डिझेल इंजिनाचे वाटप करण्यात येऊन उर्वरित इंजिनाची बेकायदा विल्हेवाट लावली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर आयुक्त कार्यालयांतर्गत चंद्रपूर, अहेरी, भामरागड, चिमुर, गडचिरोली, देवरी, नागपूर येथील प्रकल्प अधिकारी यांनी विविध योजनांमध्ये १२ कोटी २५ लाख १४ रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार केला असून यात आदिवासींसाठी दुधाळ जनावरे खरेदी करणे, कन्यादान योजना, शेतीसाठी पंप व पाईप खरेदी तसेच मिर्ची दळण यंत्र, पिठाची लहान गिरणी, शेवयाचे यंत्र, लाऊडस्पीकर व मंडप, किटकनाशके, शेतीसाठी तारेचे कुंपण, खते, शिलाई मशीन तसेच सायकल साहित्य वाटपामध्ये हा गैरव्यवहार झाल्याचे अहवालात नमूद आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच ठाणे अप्पर आयुक्त कार्यालयांतर्गत पालघरमधील मुलांमुलींचे स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण व बोरीवली, ठाणे, जव्हार, घोडेगाव, शहापूर ,पेण,वाडा व मोखाडा येथे कॉम्प्युटर, इंग्लिश स्पिकींग, कॉम्प्युटर अकाऊंटींग, कॉम्प्युटर मेंटेनन्स अँड अकाऊटींग या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रकल्प अधिकाऱ्यांनी विविध योजना लाभार्थ्यांकडे पोहोचल्याचे कागदोपत्री दाखवून संगनमताने लाखो रुपयांच्या निधीत गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(५) तसेच नाशिक विभागातील कळवण, नाशिक, राजूर, तळोदा, नंदूरबार व यावल प्रकल्पांतर्गत सुमारे ३७ कोटी २५ लाख २३ हजार रुपयांचा गैरव्यवहार झाला असून या विभागामार्फत कन्यादान योजनेंतर्गत नाशिक विभागात ८०० विवाह कागदोपत्री दाखवून प्रकल्प अधिकाऱ्यांनी यात देखील गैरव्यवहार केल्याचे खरे आहे काय,
(६) असल्यास, नाशिक, ठाणे, नागपूर व अमरावती आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या सर्व गैरव्यवहारांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) ते (६) यासंदर्भात, श्री.बहिराम पोपटराव पवार व इतर यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्रमांक १५३/२०१२ मध्ये दाखल केली. त्यावर झालेल्या सुनावणीवेळी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सेवानिवृत्त न्यायमूर्ती मा.श्री.एम.जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती.

मा.न्यायमूर्ती श्री.एम.जी.गायकवाड यांच्या समितीने सादर केलेल्या चौकशी अहवालाची व्याप्ती फार मोठ्या स्वरुपाची असल्यामुळे त्याची छाननी, विश्लेषण व करावयाची कार्यवाही तातडीने व्हावी या अनुषंगाने स्वतंत्ररित्या जलद गतीने अभ्यास करुन पुढील कार्यवाहीसाठी शिफारस करण्यासाठी भारतीय प्रशासन सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची पूर्णवेळ समिती नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## लातूर समाजकल्याण विभागांतर्गत भोजन पुरवठा करण्याचे कंत्राट रद्द केल्याबाबत

**(१२) * ९२१५७ श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रादेशिक कार्यालय, समाजकल्याण,लातूर विभागातंर्गत सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात विभागीय व जिल्हास्तरावरील मुलामुलींना भोजन पुरवठा करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निविदा मे.तेजल ट्रेडर्स यांना मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.तेजल ट्रेडर्स यांनी केलेल्या भोजन पुरवठ्यामुळे मुलांना विषबाधा झाल्याने त्यांची निविदा रद्द केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१३-१४ च्या निविदेत भाग घेतलेल्या दुसऱ्या क्रमांकाच्या निविदा धारकास सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, लातूर यांनी सदर भोजन पुरवठा करण्यास आदेशित केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर भोजन पुरवठा करण्याच्या निविदा प्रक्रियेत कोणताही सहभाग न घेतलेल्या मे.संतोष ट्रेडर्स यांना सदर भोजन पुरवठा करण्याचे बेकायदेशीर कंत्राट मंजूर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर बेकायदेशीर भोजन पुरवठा करण्याचे आदेश दिल्याप्रकरणी संबंधित दोषी अधिकाऱ्यांची चौकशी केली वा करण्यात येत आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) होय.

(३) हे खरे नाही, मात्र सहायक आयुक्त पत्र क्र.४५८०, दिनांक ७/१२/२०१६ अन्वये मे. तेजल ट्रेडर्स, लातूर यांचा भोजन ठेका रद्द करून त्यांचे नाव काळ्या यादीत टाकणेबाबचा प्रस्ताव आयुक्तालयास सादर केला आहे.

(४) हे खरे नाही

(५) नाही, सदर निविदेत भाग घेतलेल्या दुस-या क्रमांकाचे निविदाधारक मे. सुनिल ट्रेडर्स, धुळे यांनी भोजन पुरवठा करण्याबाबत असमर्थता दर्शविल्यामुळे तसेच तिस-या क्रमांकाचे निविदाधारक, महाराष्ट्र स्टेट को-आप कझ्युमर फेडरेशन, मुंबई यांना भोजन पुरवठा आदेश देण्याबाबतची शिफारस शासनाने अमान्य केल्याने त्यांना भोजन पुरवठा आदेश देण्यात आले नाहीत.

त्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या भोजनाची गैरसोय होवु नये याकरिता पर्यायी व्यवस्था म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात संतोष ट्रेडर्स, लातुर यांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचेकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(६) हे खरे नाही. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या भोजनाची गैरसोय होवु नये याकरिता पर्यायी व्यवस्था म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात संतोष ट्रेडर्स, लातुर यांना प्रादेशिक उपायुक्त, लातुर यांनी भोजन पुरवठ्याचे आदेश दिले त्यांच्याविरूध्द कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तसेच राज्यातील सर्वच वसतीगृहासाठी नव्याने भोजन ठेका देणेबाबत ई-निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येत आहे.

-----------------

## उमरे (ता. खालापूर जि. रायगड) या आश्रमशाळेला खुडेद (ता. विक्रमगड जि. पालघर) येथे स्थलांतरास बेकायदेशीरपणे परवानगी दिल्याबाबत

**(१३) * ९३८४८ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पद्मश्री अण्णासाहेब जाधव संचलित अनुदानित आश्रमशाळा उमरे (ता. खालापूर जि. रायगड) या आश्रमशाळेला शासकीय नियमांचे उल्लंघन करुन खुडेद (ता. विक्रमगड जि. पालघर) येथे स्थलांतरित होण्यास बेकायदेशीरपणे परवानगी दिल्याने सदरहू निर्णयास स्थगिती देण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधी-भिवंडी पूर्व यांनी सचिव, आदिवासी विकास विभाग व आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांच्याकडे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आश्रमशाळेने आश्रमशाळा संहिता ३.४१ व ३.४२ या नियमांचे पालन न करणे, तेथील स्थानिक ग्रामपंचायतीची परवानगी न घेणे, शासकीय आश्रमशाळा खुटळ (ता.वाडा जि. पालघर) या शाळेचे स्थलांतरीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांना काही आदिवासी विकास विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने आश्रमशाळा स्थलांतरीत केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या आश्रमशाळेस स्थलांतरीत केल्यामुळे खालापूर तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असल्याबाबत तसेच पालघर जिल्ह्यात यापूर्वीही ५ ते ६ शाळा असल्याने स्थलांतरास परवानगी न देण्याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी मागील काही वर्षापासून शासनाकडे लेखी निवेदनानुसार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उक्त आश्रमशाळेस दिलेल्या स्थलांतरास तातडीने स्थगिती देण्याबाबत तसेच याप्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) पद्मश्री अण्णासाहेब जाधव संचलित अनुदानित आश्रमशाळा उमरे (ता.खालापूर, जि.रायगड) या आश्रमशाळेला खुडेद (ता.विक्रमगड,जि.पालघर) येथे स्थलांतरित करण्याच्या निर्णयास स्थगिती देण्याबाबतचे लेखी निवेदन लोकप्रतिनिधी भिवंडी पूर्व यांनी सचिव आदिवासी विकास विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्रयत्न करुनही सदर आश्रमशाळेची पटसंख्या पूर्ण होत नसल्याने तसेच खुडेद येथे चांगल्या भौतीक सुविधा उपलब्ध असल्याने स्थलांतरणास मंजूरी देण्यात आली आहे. ग्रुप ग्रामपंचायत, उंबरे व ग्रामपंचायत, खुडेद यांनी सदर आश्रमशाळा स्थलांतरीत करण्यास ना-हरकत ठराव मंजूर केला आहे.

(३) कर्जत तालुक्यात ५ शासकीय आश्रमशाळा व १ अनुदानित आश्रमशाळा असून खालापूर तालुक्यात १ शासकीय आश्रमशाळा आहे. तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते, हे खरे नाही.

तथापि, लोकप्रतिनिधींनी सदर शाळेच्या स्थलांतरणास परवानगी न देण्याबाबत लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे.

(४) व (५) अनुदानित आश्रमशाळा उमरे (ता.खालापूर, जि.रायगड) या आश्रमशाळेमध्ये विद्यार्थी पटसंख्या कमी असल्याने ती खुडेद (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथे स्थलांतरित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे. सबब, सदर निर्णयास स्थगिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेगाव (जि.बुलढाणा) येथील नाफेडच्या संचालकाने जमीन नसताना शासनाला तूर विकल्याबाबत

**(१४) * ८४९८८ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने एका शेतक-याकडून एकरी पाच क्विंटल तूर खरेदी करण्याचा आदेश दिला असतांना शेगावमध्ये नाफेडचे संचालक श्रीधर पाडुंरंग पाटील यांनी २५० क्विंटल तूर विकल्याची बाब दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेगाव (जि. बुलढाणा) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांनी आणि व्यापा-यांनी तूर खरेदी-विक्री संस्था आणि बाजार समितीच्या कर्मचा-यांच्या सहाय्याने हजारो क्विंटल तूर विकून २६ लाख १५ हजार रुपयांची शासनाची फसवणूक केल्याची फिर्याद सहाय्यक निबंधक यांनी

दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहाराची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानूसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) कृषी उत्पन्न बाजार समिती,शेगांव चे समिती सदस्य श्री.श्रीधर पांडुरंग पाटील यांनी शेगांव येथील नाफेड तूर खरेदी केंद्रावर २३८ क्विंटल तूर विक्री केल्याचे सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शेगांव यांनी केलेल्या चौकशीमध्ये स्पष्ट झालेले आहे.
(२) होय.

कृषी उत्पन्न बाजार समिती, शेगांव चे समिती सदस्य श्री.श्रीधर पांडुरंग पाटील व श्री.निलेश प्रेमसुखदास राठी यांनी नाफेड तुर खरेदी केंद्रावर तुर विक्री केल्याप्रकरणी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, शेगांव यांनी पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक २४१, दिनांक ९/६/२०१७ अन्वये फिर्याद दाखल करुन फौजदारी गुन्हा त्यांचेविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे.
(३) व (४) पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या गुन्हयाच्या अनुषंगाने पुढील तपासाची कार्यवाही पोलीस स्टेशन, शेगांव यांच्यामार्फत सुरु आहे.

तसेच सदर समिती सदस्यांचे परवाने रद्द केले असून त्यांचे सदस्य पद रद्द करणेबाबत बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या दिनांक २८/७/२०१७ च्या सभेमध्ये ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्याचबरोबर तूर खरेदीमध्ये शेतकऱ्यांऐवजी व्यापाऱ्यांची तूर खरेदी करण्यात आली आहे. अशा स्वरुपाच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे मा.जिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आली असून, चौकशीत दोषी आढळून आलेल्या व्यक्तींवर नियमाप्रमाणे फौजदारी खटला दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात लागू करण्यात आलेले वीज भारनियमन रद्द करणेबाबत

**(१५) * ८५०८७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरणतर्फे भारनियमन सुरु असून अंदाजे ४ हजार मेगावॅट विजेचा तुटवडा असल्याचे शासनाने जाहीर केले असून सदरचे वीज भारनियमन दररोज ८ ते १२ तासापर्यंत करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीने वीज नियामक आयोगाकडे वीजदरवाढीचा प्रस्ताव माहे जून, २०१६ मध्ये सादर करतेवेळी वीज कंपन्यांकडे ९ हजार मेगावॅट अतिरिक्त वीज शिल्लक असल्याचे सदरच्या प्रस्तावात नमूद केले होते, तसेच त्यासाठी वीज ग्राहकांकडून दरवर्षी ४ हजार कोटी रुपये कॅपॅसिटी चार्जेस म्हणून आकारणी करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनीने विद्युत नियामक आयोगास सांगितल्यानुसार कंपनीकडे अतिरिक्त वीज मोठ्या प्रमाणात शिल्लक असताना राज्यात भारनियमन लागू करण्याची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहेत,
(४) असल्यास, सदर भारनियमनास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) माहे एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या तापमानातील बदलांमुळे वीजेच्या मागणीत झालेली मोठी वाढ व तांत्रिक कारणास्तव उपलब्धतेत झालेली घट यामुळे दि. २७.०४.२०१७ ते ०६.०५.२०१७ पर्यंत भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाली होती. दिनांक ०७.०५.२०१७ पासून राज्यात वीजेच्या उपलब्धतेच्या कमतरतेमुळे कुठेही भारनियमन करण्यात आलेले नाही.
(२) महावितरणने दिर्घकालीन वीजखरेदीचे करार करतांना १७ व्या इलेक्ट्रीकल पॉवर सर्व्हे नुसार अंदाजित केलेल्या वीजवापरातील ८ % अनुमानित वाढ गृहीत धरली होती. परंतु प्रत्यक्षात ही वाढ साधारणत: ३.५% झाल्याने वीजेची अतिरिक्त उपलब्धता निर्माण झाली. वीज दर वाढीच्या प्रस्तावामध्ये महावितरणने सन २०१६-१७ वर्षामध्ये ६३७९ मे.वॅ. एवढी वीज अतिरिक्त राहील व त्यांचे कॅपॅसिटी चार्जेस हे ३३९८ कोटी आहेत असे नमूद केले होते. सदर चार्जेसची वसुली ओपनॲक्सेस ग्राहकांकडूनही करण्यात येते.
(३) माहे एप्रिल २०१७ मध्ये झालेल्या तापमानातील बदलांमुळे वीजेच्या मागणीत झालेली मोठी वाढ व तांत्रिक कारणास्तव उपलब्धतेत झालेली घट यामुळे दि. २७.०४.२०१७ ते ०६.०५.२०१७ पर्यंत भारनियमनाची परिस्थिती निर्माण झाली होती. दिनांक ०७.०५.२०१७ पासून राज्यात वीजेच्या उपलब्धतेच्या कमतरतेमुळे कुठेही भारनियमन करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भडगाव (जि. जळगांव) येथील नाचणखेडा रोडवर वीजवाहक तार पडल्याने एका मेंढपाळाचा झालेला मृत्यू

**(१६) * ९२१७४ श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगांव) येथील नाचणखेडा रोडवर मुख्य वीज वाहिनीची तार अंगावर पडल्याने दिनांक १३ जून, २०१७ रोजी च्या सुमारास शॉक लागून एका मेंढपाळाचा मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या घटनेनंतर वीज मंडळाचा एकही अधिकारी घटनास्थळी आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या घटनेची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मृतांच्या नातेवाईकांला शासनाने कोणती तातडीची मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर घटनेची माहिती कळताच महावितरणचे संबंधित सहाय्यक अभिंयता व कनिष्ठ अभियंता हे घटनास्थळी गेले होते.

(३) सदर अपघाताची चौकशी विद्‌युत निरीक्षकामार्फत करण्यात आली असून संबंधित महावितरण उपविभागीय अभियंत्यावर कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. मृताच्या नातेवाईकास महावितरण कंपनीकडून तातडीची रक्कम रु. २०,०००/- (रु. वीस हजार) ची मदत दि. १४/०६/२०१७ रोजी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बांदा तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) पाऊस व चक्री वादळामुळे सटमटवाडीतील वीज पुरवठा बंद पडल्याबाबत

**(१७) * ८४९९९ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा तालुक्यात (जि.सिंधुदुर्ग) पाऊस व चक्री वादळामुळे सटमटवाडीतील वीजेचे खांब पडून वीज पुरवठा बंद पडल्याने तेथील नळपाणी पुरवठा योजनाही दिनांक १३ मे, २०१७ रोजी बंद पडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांनी वीज पुरवठा व नळपाणी पुरवठा योजना पुर्ववत होण्यासाठी वीज वितरण कार्यालय, अधिकारी यांना निवेदने देऊनही कार्यवाही न झाल्याने वीज वितरण कार्यालयावर महिलांसह ग्रामस्थांनी घागर मोर्चा काढून महावितरण अधिका-यांचा निषेध केला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बांदा तालुक्यातील खंडित वीज पुरवठा पुर्ववत सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) दि. ०६/०५/२०१७ रोजी बांदा परिसरामध्ये झालेल्या चक्री वादळामुळे उच्च दाब पोल व वाहिनीचे नुकसान झाल्यामुळे सदर परिसरातील वीज पुरवठा व नळपाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा खंडीत झाला होता. सदर वीज पुरवठा टप्प्याटप्प्याने दि. १२/०५/२०१७ पर्यंत पूर्ववत सुरु करण्यात आला.
(२) हे खरे नाही.
(३)महावितरण कंपनीमार्फत पडझड झालेल्या उच्चदाब व लघुदाब वाहिन्यांची कामे करुन वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गंगाखेड शुगर ॲन्ड एनर्जी लि. (जि.परभणी) या कारखान्याच्या संचालकांनी शेतकऱ्यांच्या नावावर कर्ज घेऊन केलेला अपहार

**(१८) * ९३५१६ श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड शुगर ॲन्ड एनर्जी लि. (जि.परभणी) कारखान्याच्या संचालक मंडळाने जिल्हयातील हजारो शेतकऱ्यांच्या नावावर पाच राष्ट्रीयकृत बँका व

एका खासगी बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करुन सुमारे ३२८ कोटी रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांच्या नावावर घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली असून त्यानुषंगाने गंगाखेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २९३/२०१७ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब), ३४ अन्वये दिनांक ०५/०७/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उक्त प्रकरणी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे क्रिमीनल रिट याचिका क्र. ८७९/२०१७ दाखल झालेली असून, त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २७/०६/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशानुसार विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयातील आरोपी यांचे जबाब नोंदवण्यात आले आहेत. तसेच या प्रकरणी पीक कर्ज मंजुर करणारे व पीक कर्जाची प्रक्रीया पूर्ण करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांची चौकशी करणे आहे. गुन्हयाची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणावर व व्यापक स्वरूपाची असून सदर गुन्हा तपासावर आहे.

(४) विलंब झाला नाही.

-----------------

## वर्धा जिल्हयातील कारंजा (घा) येथे २२० केव्ही उपकेंद्र मंजूर करण्याबाबत

**(१९) * ९१४७३ श्री.अमर काळे (आर्वी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील कारंजा (घा.) येथील व आष्टी उपविभागातील कार्यान्वित असलेली एकूण ३३ केव्हीची ८ उपकेंद्रे तळेगाव (शा.पं) (ता. आष्टी) या १३२ केव्ही उपकेंद्रास जोडलेली आहेत तथापि तारा वाहिन्या घनदाट जंगलांमधून जात असल्यामुळे पावसाळयात अनेकदा बिघाड होतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी विद्युत पुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास होत असल्याने येथे २२० केव्ही उपकेंद्र तातडीने मंजूर करावे अशा प्रकारचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांस दिनांक १७ जून, २०१७ रोजी दिले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपकेंद्र तातडीने मंजूर करण्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे,
(२) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) कारंजा, जि. वर्धा येथे २२० के.व्ही. नवीन उपकेंद्र उभारण्याच्या योजनेचा राज्य पारेषण उपक्रमाच्या पंचवार्षिक योजनेत समावेश असून उपकेंद्र सन २०२०-२१ मध्ये कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित आहे. उपकेंद्रासाठी शासकीय जमीन उपलब्ध न झाल्याने खाजगी जमिनीची निवड करण्यात आली असून जमीन अधिग्रहणाची तसेच उपकेंद्राच्या योजनेस प्रशासकीय मान्यता घेण्याबाबतची प्रक्रिया महापारेषण कंपनीकडून सुरु आहे. त्यानंतर प्रस्ताव राज्य वीज नियामक आयोगाकडे तत्वत: मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यात महावितरणने केलेल्या गैरकारभाराबाबत

**(२०) * ९२८१५ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वीजजोडणी करीता आवश्यक रक्कमेचा धनादेश महावितरणकडे भरूनसुध्दा शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यामधील महावितरणाच्या रिक्त पदांमुळे एल.टी. लाईन उभारताना कामे शेतकऱ्यांना करावी लागत असून जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये विद्युत ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड झाल्यास त्याची वेळेवर दुरूस्ती करण्यात येत नाही तर अनेक ग्राहकांना चुकीचे वाढीव विद्युत देयके दिल्याच्या तक्रारी ग्राहकांनी महावितरणकडे करूनही त्यावर कोणतीच कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सन २०१६-१७ मध्ये सदर जिल्हयात विविध योजनांतर्गत १५९८ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मे, २०१७ अखेर ४७६४ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) उस्मानाबाद जिल्हयात एकूण वाहिनी कर्मचाऱ्यांची १२० पदे रिक्त असून त्यापैकी ११३ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आली आहेत. जिल्हयात देखभाल व दुरुस्तीचे कामे ठेकेदारामार्फत निविदाव्दारे करण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत जिल्हयात ६१ विद्युत रोहित्रे दुरुस्तीचे काम बाकी असून रोहित्र दुरुस्तीचे कामे ठेकेदार मार्फत केले जात आहेत. उस्मानाबाद जिल्हयाअंतर्गत आठवडयातील दर सोमवारी ग्राहक तक्रार निवारण मेळाव्याचे

आयोजन केले जात असून चुकीच्या वाढीव बिलाच्या तक्रारीचे निवारण तात्काळ केले जाते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने मॆं.राजकुमार गुलाटी नागपूर यांना दुप्पट दराने हमाली कामाचे कंत्राट दिल्याबाबत

**(२१) * ९१४९०  श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी) :**  सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा एमआयडीसी नागपूर येथील माथाडी कामगारांना दिंनाक १ नोव्हेंबर, २०१५ ते ३१ ऑक्टोंबर ,२०१८ या कालावधीकरीता प्रति बोरा ५ रूपये ४४ पैसे ते ६ रूपये २३ पैसे दर ठरविण्यात आला असताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने वाडी हिंगणा वखार केंद्रावर हमाली कामाचा ठेका मॆं.राजकुमार गुलाटी नागपूर यांना दिंनाक १ ऑक्टोबर, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१८ या कालावधीसाठी नियमबाह्य पध्दतीने प्रति बोरा १७ रूपये ५० पैसे ते १९ रूपये म्हणजे तिप्पट दराने देऊन शासनाची फसवणूक केली असल्याची बाब दिनांक २० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथाडी कामगारांचा दर कमी असतानाही त्यांच्याकडून हमाली काम न करता तिप्पट दराने ठेकेदाराच्या मार्फत हमाली काम करून त्यांना कोट्यावधी रूपयांचे नियमबाह्यरित्या देयक मंजूर करून अदा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर प्रकरणी राज्य शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

हाताळणी व वाहतूक ठेका देणेसाठी आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी विहित ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन ठेका देण्यात आलेला आहे. या निवड झालेल्या ठेकेदारास हमालीची कामे नोंदणीकृत माथाडी मंडळाकडून करून घेणे बंधनकारक असते. माथाडी कामगारांचे मजूरीचे दर माथाडी मंडळाकडून निश्चित केले जातात व या दरावर ३०% लेव्ही अनुषंगीक खर्च ठेकेदारास देणे आवश्यक असते.

(४) लागु नाही.

-----------------

## राज्यातील १०७५ आश्रमशाळांची असलेली दुरावस्था व मुलींच्या असुक्षिततेबाबत

**(२२) * ९१९५७ श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकूण १०७५ अनुदानित आश्रमशाळांमध्ये दोन लाखांपेक्षा जास्त मुली शिक्षण घेत असून सदरील सर्व शाळांमध्ये आजारी मुलींसाठी स्वतंत्र कक्ष नसणे, पिण्याचे पाणी अशुद्ध असणे, अनियमित आरोग्य तपासणी होणे, शौचालयाची दुरावस्था असणे या सर्व कारणांमुळे मुलींचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांमधील निवासगृहांच्या दरवाजे व खिडक्यांची दुरावस्था झाली आहे, अनेक शाळांना संरक्षक भिंत नाही, रात्रीच्यावेळी मुलींसोबत स्त्री अधिक्षिका उपस्थित नसतात या कारणांमुळे शाळेत शिकणाऱ्या मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व गंभीर प्रकाराकडे लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व आदिवासी विकास मंत्री यांना लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने या गैरसोयी तात्काळ दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत ५५६ अनुदानित आश्रमशाळांना व ५५२ शासकीय आश्रमशाळांना मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ५४६ अनुदानित आश्रमशाळा व ५२९ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत.

(२) हे ही खरे नाही.

(३) मा.श्री.राहुल मोटे, विधानसभा सदस्य यांनी असे निवेदन मा.मंत्री, आदिवासी विकास यांना दि.२७.०६.२०१७ रोजी दिले आहे, हे खरे आहे.

(४) व (५) शासकीय आश्रमशाळांमध्ये उन्हाळ्याच्या सुट्टयांमध्ये "विशेष मोहीम" राबवून किरकोळ दुरुस्तीची कामे केली आहेत. तसेच आश्रमशाळांमधील किरकोळ दुरुस्तीची कामे शाळा व्यवस्थापन समितीच्या निधीतून करण्यात आली आहेत. तसेच सर्व शासकीय आश्रमशाळांना संरक्षण भिंत बांधण्याचे नियोजन केलेले आहे. अनुदानित आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षिकेचे पद निर्माण केले असून "अ", "ब" व "क" वर्गवारी असलेल्या शाळांमध्ये पद भरती केली आहे. तसेच शासकीय आश्रमशाळांमधील स्त्री अधिक्षिकेचे पदभरतीची परिक्षा घेण्यात येऊन नियमित नियुक्ती ऑगस्ट, २०१७ अखेर करण्यात येत आहे. दरम्यानच्या काळात स्त्री शिक्षकांकडे पदभार देण्यात आला असून मुलींच्या वसतीगृहामध्ये संध्याकाळी राहण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पहारेकरी यांची पदे तात्काळ भरण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांकडून करण्यात येते. बहुतांश शाळांमध्ये स्वच्छ पाण्यासाठी वॉटर फिल्टर बसविण्यात आले आहेत. स्वच्छ पाणीपुरवठा, शौचालयाची व्यवस्था, नियमित आरोग्य तपासणी, आश्रमशाळांची दुरुस्ती, दरवाजे-खिडक्यांची दुरुस्ती, संरक्षक भिंत बांधणे, आजारी मुलांसाठी स्वतंत्र कक्ष ठेवणे इत्यादीबाबत अनुदानित आश्रमशाळा व्यवस्थापनाला सूचना देण्यात येत आहेत.

-----------------

## बीड तसेच हिंगोली जिल्ह्यातील शेतक-यांच्या कृषीपंपाना वीज जोडणी मिळाली नसल्याबाबत

**(२३) * ९१५६६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)बीड जिल्ह्यातील शेतक-यांनी कृषी पंपांना वीजजोडणी मिळावी यासाठी महावितरणकडे रितसर कोटेशन भरले असतानाही माहे मार्च, २०१७ अखेर जिल्ह्यातील सुमारे ६ हजार ७७० शेतक-यांच्या कृषीपंपाला वीज जोडणी मिळाली नसल्याचे माहे, मे २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच हिंगोली जिल्ह्यात देखील कृषीपंपासाठी असलेल्या वीज जोडणीच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्यामुळे चार हजार शेतकरी वीज जोडणीच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यात तीन हजार आठशे शेतक-यांना वीज जोडणी देण्याअगोदरच वीज वितरण कंपनीने थेट देयकेच दिली असल्याची माहिती माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त दोन्ही जिल्ह्यात अनामत रक्कम भरुनही वीज जोडण्या प्रलंबित राहिल्यामुळे शेतक-यांची गैरसोय होत असून अद्यापर्यंत महावितरणकडून वीज जोडणी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, तातडीने वीज जोडणी देऊन शेतक-यांची समस्या दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) बीड जिल्ह्यात मार्च, २०१७ अखेर ६७७० कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते.

(२) हिंगोली जिल्ह्यात एप्रिल, २०१७ अखेर ३७३९ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते.

(३) महावितरण आपल्या दारी योजनेअंतर्गत सन २०११ ते २०१५ मध्ये हिंगोली जिल्हयाअंतर्गत ४३९५ कृषी ग्राहकांना त्यांच्या संमतीनेच केबलद्वारे वीज पुरवठा देण्यात आला असून सदर ग्राहकांना रितसर वीज देयके देण्यात आलेली आहेत.

(४) बीड जिल्हयामध्ये सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत १८७३ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व सन २०१७-१८ मध्ये जून, २०१७ पर्यंत १०१३ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. तसेच हिंगोली जिल्हयामध्ये सन २०१६-१७ मध्ये विविध योजनांतर्गत २६५१ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे व सन २०१७-१८ मध्ये जून, २०१७ पर्यंत ३३४ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) विविध योजनांतर्गत सदर जिल्हयामधील प्रलंबित कृषीपंपाच्या वीज जोडणीची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कृषी पंपाना वीज जोडणी देण्याबाबत

**(२४) * ९०९०२ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील शेतक-यांनी कृषी विद्युत पंपासाठी वीज जोडणी मिळणेसाठी सन २०१० पासून अनामत रक्कम भरूनही हजारो शेतक-यांना विद्युत पंपांची जोडणी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत कृषी पंपांना विद्युत जोडणी न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, नांदगाव तालुक्यातील शेतक-यांना तात्काळ वीज जोडणी देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) नांदगाव तालुक्यामध्ये सन २०१६-१७ या वर्षांत ५७ कृषीपंपाना वीजजोडण्या देण्यात आल्या असून मार्च, २०१७ अखेर २४१८ कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत व त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(३) विविध योजनातर्गंत उर्वरित प्रलंबित कृषी पंपाना वीज जोडण्या देण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सलाई ग्रामपंचायतीत (ता.मेळघाट, जि.अमरावती) निधीत गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत

**(२५) * ९२६५३ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्र पंचायत विस्तार कायद्यांतर्गत (पेसा) आदिवासी भागातील ग्रामपंचायतींना मिळणा-या पाच टक्के निधीमध्ये सलाई ग्रामपंचायतीत (ता.मेळघाट) गैरव्यवहार सुरू असून बनावट कागदपत्रांच्या आधारे निधीमध्ये गैरव्यवहार करण्यात आल्याबाबत नागरिकांनी तक्रार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदरहू प्रकरणी दोषी असणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) नाही.

(२) उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली असून ५%थेट निधी अंतर्गत ग्रामपंचायत सालई येथे बनावट कागदपत्राचे आधारे निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पारस औष्णिक विद्‌युत केंद्रातून निघणाऱ्या फ्लाय ॲशमुळे परिसरातील गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(२६) * ९२०८३ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारस औष्णिक विद्‌युत केंद्र (जि. अकोला) यातून निघणाऱ्या फ्लाय ॲशमुळे परिसरातील १० ते १२ गावातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असल्याच्या तक्रारी संबंधित गावाच्या सरपंच संघटनेने औष्णिक प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांकडे मागील वर्षभरापासून वारंवार केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त औष्णिक प्रकल्पातून बाहेर पडणाऱ्या फ्लाय ॲशवर नियंत्रण ठेवणारी ई.एस.पी ची यंत्रणा अखंडित सुरु ठेवणे आवश्यक असतानाही रात्रीच्या वेळी मात्र सदर यंत्रणा काही वेळासाठी बंद करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर औष्णिक प्रकल्पाद्‌वारे होणारे प्रदूषण कमी करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त प्रश्न भाग (१) मधील तक्रारीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाने राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील ४४ हजार कि.मी. क्षेत्र मद्य व बार मुक्त न केल्याबाबत

**(२७) * ८५३५६ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील अपघात टाळण्यासाठी मा. सर्वोच्च्य न्यायालयाने ५०० मीटर परिसरातील मद्य विक्रीवर निर्बंध घातले असतानाही राज्यातील ४४ हजार कि.मी. पैकी केवळ २ ते अडीच हजार कि.मी. चे क्षेत्र मद्यविक्री मुक्त झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्य महामार्गावर एकूण किती मद्य विक्री व बियरबार सुरु होते व त्यापैकी किती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंद करण्यात आले आहेत व बंदी घातल्यानंतर शासनाचा किती कोटींच्या महसूलाचे नुकसान झाले आहे,

(३) तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करुन, राज्य शासनाने, बाधित मद्य विक्री व बियरबार मालकांना दिलासा देण्यासाठी, राष्ट्रीय व राज्य महामार्ग स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला असून त्यांची रस्तांची डागडूजी करण्याची आर्थिक क्षमतेचा शासनाने अभ्यास केला आहे काय,

(४) नसल्यास, याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे तसेच न्यायालयाने शासनाला कोणते मार्ग राष्ट्रीय किंवा राज्य महामार्ग असल्याची अधिसूचना न्यायालयासमोर सादर करण्याचा आदेश दिला असल्याची बाब उघडकीस आली असून राज्य महामार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग यांची वर्गवारी करणारी अधिसूचना सापडत नसल्याचे राज्य शासनाने उच्च न्यायालयाला सांगितले हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू अधिसूचना उपलब्ध नसण्याची कारणे काय आहेत, तसेच शासन उक्त प्रश्नोक्त बाबींवर कोणती कार्यवाही करत आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. राष्ट्रीय/राज्य महामार्गावरील ५०० मीटर पेक्षा कमी अंतरावरील तसेच २०,००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये २२० मीटर अंतरामध्ये असलेली सर्व मद्य विक्री अनुज्ञप्त्या बंद करण्यात आल्या आहेत.
(२) सर्व राष्ट्रीय व राज्य महामार्गावर ५०० मीटर परिसरातील एकूण १५०३३ मद्य विक्री व बिअर बार सुरू होते व त्यापैकी १५०३३ मा. न्यायालयाच्या आदेशानंतर बंद करण्यात आले आहेत व त्यानंतर प्रत्येक प्रकारच्या मद्यविक्रीत १२% ते २२% पर्यंत घट झालेली आहे.
(३) शासन निर्णय क्र. आरबीडी-१०८१/८७१/रस्ते-७ दिनांक ०९.०३.२००१ नुसार महानगरपालिका/ नगरपरिषदेच्या हद्दीतील वर्गीकृत रस्ते अवर्गीकृत करणारी अधिसुचना सार्वजनिक बांधकाम विभागाने काढल्यानंतर संबधीत महानगरपालिका/नगरपरिषद यांना सदर रस्त्यांचा ताबा दिला जातो.याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा कोणताही अवमान करण्यात आलेला नाही.
(४) व (५) राष्ट्रीय मार्ग व राज्य मार्ग असल्याच्या अधिसुचनेबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांना माहिती देण्यात आली होती.त्यानुसार मा. न्यायालयाने निर्णय दिलेला आहे.सध्या सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

-----------------

## चिल्लारवाडी (ता.माण, जि.सातारा) व भोंडवेवाडी (ता.बारामती,जि.पुणे) येथील दोन शेतकऱ्यांनी केलेली आत्महत्या

**(२८) * ९०१३३ श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिल्लारवाडी (ता. माण,जि.सातारा) व भोंडवेवाडी (ता.बारामती,जि.पुणे) येथे दोन शेतकऱ्यांनी बँका व खासगी सावकारांच्या कर्जाच्या तगाद्याने कंटाळून माहे जून,२०१७ च्या पहिल्या आठवडयात आत्महत्या केल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना शासनाने कोणते आर्थिक साह्य केले वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे.

आत्महत्या केली आहे, परंतु आत्महत्येचे कारण स्पष्ट झालेले नाही.

(२) होय.

(३) थकबाकीची रक्कम वसुल करणे कामी सहकारी संस्थांनी कोणतीही कायदेशीर कारवाई केलेली नाही तसेच रक्कम भरण्यासाठी तगादा लावलेला नाही. संबंधीतांकडून सावकारी कर्जाबाबतची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) बारामती तालुक्यातील मौजे भोंडवेवाडी येथील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी रू. १ लाख एवढे अर्थसाह्य देण्यात आले आहे.

माण तालुक्यातील मौजे चिल्लारवाडी येथील श्री. सुभाष शिंगाडे यांनी आत्महत्या केली यास्तव आर्थिक साह्य मिळणेबाबतची कार्यवाही तहसिलदार, माण (दहिवडी) यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे यामध्ये अधिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२९) * ९३०७५ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात  मुरबाड आश्रमशाळेत विजेचा धक्का लागून आदिवासी विद्यार्थ्याचा माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे  खरे आहे काय,

(२) तसेच पालघर जिल्हयातील शासकीय आश्रमशाळा, वसतिगृहे यामध्ये अधिक्षकांची पदे रिक्त असून सदर  शासकीय वसतिगृहे व आश्रमशाळा भाडयाच्या इमारतीत सुरु असल्याचेही माहे जून, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे भरण्याकरिता तसेच वसतिगृहांना व आश्रमशाळांना स्वतःची जागा उपलब्ध करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच प्रश्न भाग १ मधील आदिवासी विद्यार्थ्याच्या मृत्यूबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींवर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पालघर जिल्हयातील जव्हार व डहाणू प्रकल्पात अधिक्षकांची अनुक्रमे १३ व २१ पदे रिक्त आहेत.  रिक्त पदे भरण्याकरीता दि.०७.०७.२०१७ रोजी ऑनलाईन परिक्षा घेण्यात आली आहे.  नियुक्ती प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प्, डहाणू अंतर्गत ३३ आश्रमशाळांपैकी ४ आश्रमशाळा व १७ शासकीय वसतिगृहांपैकी १४ वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत आहेत.  डहाणू अंतर्गत सर्व ३३ आश्रमशाळांना जमिनी प्राप्त आहेत. भाडयाच्या इमारतीत असलेल्या ४ आश्रमशाळांचे इमारत बांधकामाबाबतची कार्यवाही सुरु आहे. तसेच १५ शासकीय वसतिगृहापैकी १३ वसतिगृहांकरिता जमीन प्राप्त करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

तसेच एकात्मिक आदिवासी प्रकल्प्, जव्हार अंतर्गत ३० आश्रमशाळांपैकी ३ आश्रमशाळा व १५ शासकीय वसतिगृहांपैकी ११ वसतिगृहे भाडयाच्या इमारतीत कार्यरत आहेत. जव्हार प्रकल्पांतर्गत ३० आश्रमशाळांना जमीन प्राप्त आहेत. मात्र भाडयाच्या इमारतीत असलेल्या ३ आश्रमशाळांच्या इमारत

बांधकामासंबंधी कार्यवाही सुरु आहे. तसेच २६ वसतिगृहे सुरु असून १३ वसतिगृहांना जमिनी प्राप्त झाल्या आहेत. ३ वसतिगृहांना जमिनी प्राप्त करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एरंडोल व पारोळा तालुक्यात (जि.जळगांव) शासकीय तूर खरेदी केंद्र सुरु करण्यात न आल्याबाबत

**(३०) * ८९२६७ डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एरंडोल व पारोळा तालुक्यात (जि.जळगांव) यावर्षी तुरीचे अधिक उत्पादन झाले असतांना तालुक्यात शासकीय तूर खरेदी केंद्र सुरु करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तूर खरेदी केंद्र सुरु नसल्याने शेतकऱ्यांना नाईलाजास्तव कमी दरात व्यापाऱ्यांना तुरीची विक्री करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकडे शासन दुर्लक्ष करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) हंगाम २०१६-१७ मध्ये केंद्रशासनाच्या किंमत स्थिरता निधी योजनेंतर्गत जळगांव जिल्हयात ९ तुर खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली होती.

एरंडोल तालुक्यातील कासोदा येथे एसएफएसी कडून तूर खरेदी करण्यात आली आहे. त्याचबरोबर एरंडोल तालुक्यातील अन्य तूर पाचोरा, अमळनेर व जळगांव येथील खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आली आहे.

पारोळा तालुक्यातील शेतकऱ्यांची तूर अमळनेर खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आली आहे.

जळगांव जिल्ह्यात केंद्रशासनाच्या व राज्यशासनाच्या विविध योजनेंतर्गत एकूण १०९३२ शेतकऱ्यांची १.३२ लाख क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## मोताळा (जि. बुलडाणा) येथील मुलींच्या शासकीय वसतीगृहाच्या दुरावस्थेबाबत

**(३१) * ८६५९८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि. बुलडाणा) येथील मुलींचे शासकीय वसतीगृह भाड्याच्या इमारतीत असल्याने भौतिक सोई-सुविधांचा व मापदंडानुसार आवश्यक सुविधांच्या अभावामुळे वसतीगृहातील मुलींची गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त शासकीय वसतीगृहाच्या समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास बुलडाणा येथे मा. सामाजिक न्याय मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, बुलडाणा येथील शासकीय वसतीगृहाची क्षमता वाढविणेबाबत व मोताळा येथील मुलींच्या शासकीय वसतीगृहाची मापदंडानुसार स्वतंत्र इमारत मंजूर करणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) होय.

(३) याबाबत आयुक्त समाजकल्याण, पुणे यांना पुढील उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) बुलडाणा येथे मागासवर्गीय मुला-मुलींसाठी प्रत्येकी एक वसतिगृह शासकीय इमारतीमध्ये आहे. त्याची मान्य संख्या प्रत्येकी ७५ आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती निमित्त १०० मुलींची क्षमता असलेले नवीन वसतिगृह भाड्याच्या इमारतीमध्ये व मोताळा येथे १०० मुलींचे क्षमता असलेले वसतिगृह भाड्याच्या इमारतीमध्ये दि. ८ मार्च, २०१६ रोजी सुरु झालेले आहे. बुलडाणा येथील जुन्या वसतिगृहाच्या खुल्या जागेमध्ये नवीन वसतिगृहाचे बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. मोताळा येथील नविन वसतिगृहांच्या इमारतीकरिता शासकीय / खाजगी जमीन उपलब्ध करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मावळ तालुक्यातील (जि.पुणे) मुंधावरे गावात बिसलेरी कंपनीने सुरू केलेल्या मिनरल वॉटर प्लांटबाबत

**(३२) * ८८२१८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) कामशेत जवळील मुंधावरे गावात बिसलेरी कंपनीने सन २०११ मध्ये वा त्यादरम्यान मिनरल वॉटर प्लांट सुरू करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिसलेरी कंपनीच्या मिनरल वॉटर प्लांटसाठी इंद्रायणी नदीच्या पाण्याचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्लांट सन २०११ मध्ये सुरू झाल्यापासून ते माहे एप्रिल,२०१७ पर्यंत इंद्रायणी नदी परिसरातील गावाना पाणी टंचाई निर्माण झाली असून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी पुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तेथील गावकऱ्यांना इंद्रायणी नदीच्या पाण्यावर घेण्यात येणाऱ्या पिकांच्या सिंचनासाठी रूपये ४००/- प्रति तास दराने पाणी विकत घ्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाकडून इंद्रायणी नदी परिसरातील शेतीला व गावांना पाणी पुरवठा होण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील कवठाळा, कोर्टीमक्ता व नांदवगा या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबत

**(३३) * ९३०७९ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील राजूरा येथील कवठाळा, कोर्टीमक्ता व नांदवगा या आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पालकमंत्री (जि. चंद्रपूर) यांना दिनांक ३० मे, २०१७ रोजी आणि मा. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांना दिनांक १७ जून, २०१७ रोजी सादर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनात आश्रमशाळेची फेरतपासणी करणे व प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग, चंद्रपूर यांची चौकशी करण्याबाबत मागणी करण्यात आली असून सदर संस्थेचे सदस्य नसतांनाही श्री. पिक्लेश्रव राठोड यांनी सचिव म्हणून खोटी सही करून शासनाच्या अनुदानात गैरव्यवहार केल्याचेही माहे जुलै, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय. हे खरे आहे.

(२) व (३) अनुदानित आश्रमशाळा कवठाळा, कोर्टीमक्ता व नांदगाव या शाळांची प्रकल्प कार्यालयामार्फत चौकशी केली आहे. चौकशी अहवालात निवासी विद्यार्थ्यांचे आधारकार्ड न काढणे, शाळेची कागदपत्रे संस्थेच्या कार्यालयात ठेवणे, विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी-सुविधा न पुरविणे, उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या कमी असणे इत्यादी बाबी निदर्शनास आणून दिल्या असून कवठाळा व नांदगाव या अनुदानित आश्रमशाळांची मान्यता रद्द करण्याबाबत प्रस्तावित केले आहे. त्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तथापि, चौकशीमध्ये श्री.पिंकलेश्वर राठोड यांनी सचिव म्हणून खोटी सही करुन शासनाच्या अनुदानात गैरव्यवहार केला असल्याचे आढळून आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील १ लाख आदिवासी विदयार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याबाबत

**(३४) * ८९८८७ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील वर्ग १ ते १० वी पर्यंतच्या १ लाख आदिवासी विदयार्थ्यांना स्वर्णमहोत्सवी आदिवासी योजनेअंतर्गत मागील २ वर्षांपासून शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सॉफ्टवेअर बंद असल्याने तसेच ऑनलाईन प्रक्रियेत विविध त्रुटी असल्याने शिष्यवृत्ती वाटपात समस्या निर्माण झाल्याचे देखील खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदार सॉफ्टवेअर कंपनीची आदिवासी विभागाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.विष्णु सवरा :** (१) सन २०१५-१६ या वर्षामध्ये सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नागपूर विभागातील इयत्ता १ ली ते १० पर्यंतच्या १,०७,२१६ विद्यार्थ्यांपैकी ६९,६७८ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्ती रक्कम जमा करण्यात आली असून प्रलंबीत ३७,५३८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(२) सन २०१५-१६ या वर्षापासून सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीची ऑनलाईन पद्धतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. तथापि, दरम्यानच्या कालावधीत संगणकीय प्रणाली विकसित केलेल्या कंपनीने तांत्रिक सहाय्य बंद केले होते. सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती प्रणालीमध्ये तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती वितरणास विलंब झाला असल्याची वस्तुस्थिती खरी आहे.

(३) सन २०१५-१६ या वर्षात घेतलेल्या मनुष्यबळाची देयके सदर कंपनीस अदा करण्यात आलेली नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाटप झालेल्या भूखंडाबाबत

**(३५) * ८९२७४ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील भूखंड क्र.आर.पी.१३९ हा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वाटप झालेला असूनही औद्योगिक विकास महामंडळातील अधिकाऱ्यांच्या चुकीच्या धोरणामुळे सन २०१३ पासून प्राथमिक करारनामा करण्यात आला नसल्याने आता या भूखंडास नवीन धोरण लागू करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास,चौकशीअंती काय निदर्शनास आले व तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) डोंबिवली औद्योगिक क्षेत्रात प्रकल्पगस्त सदरखाली १० शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन मे. श्री.गणराज कॉमर्स प्लाझा या कपंनीची स्थापना करुन महामंडळाच्या धोरणाप्रमाणे भूखंड क्र. आरपी १३९ मागणी केल्याने त्यांना देकारपत्र दि. २७/११/२०१३ रोजी, वाटपपत्र ०४/०३/२०१४ व भूखंडाचा ताबा ०६/०६/२०१३ रोजी देण्यात आला. तथापि महामंडळाच्या दिनांक १७/११/२०१३ च्या परिपत्रका प्रमाणे प्रकल्पग्रस्त खातेदाराच्या वारसाची प्रमाणपत्रे सादर न करता भूखंडाचा करारनामा करुन मिळण्याची मागणी केल्याने वारस दाखला केल्याशिवाय प्राथमिक करारनामा करणे कायदेशिर होणार नाही असे निर्देशित करण्यात आले आहे.

-----------------

## अलिबाग व मुरुड (जि. रायगड) तालुक्यामधील विजेचे खांब व विद्युत डी.पी. नादुरूस्त स्थितीत असल्याबाबत

**(३६) * ८५९७५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग व मुरुड तालुक्यामधील (जि.रायगड) शहरी व ग्रामीण भागामधील अनेक विजेचे खांब खालच्या बाजूने पूर्णपणे गंजलेले असून विद्युत डी.पी.ही नादुरूस्त स्थितीत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुरुड तालुक्यात वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने याबाबत अधिकारी, कर्मचारी यांचेकडे विचारणा केली असता त्यांचेकडून समाधानकारक उत्तरे देण्यात येत नसल्याने संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी, मुरुड वीज मंडळ कार्यालयावर मोर्चा नेल्याची बाब दिनांक ३१ मे, २०१७ रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) तसेच पेण तालुक्यातही खारेपाट भागातील माऊलीचीवाडी, वडखळ येथील खांब जीर्ण व धोकादायक असून कोणत्याही क्षणी कोसळून मोठा अपघात होऊ शकतो तसेच माहे जून, २०१७ मध्ये वडखळ विद्युत वितरण विभागाकडून रोज रात्री ८ ते १० तास वीज पुरवठा खंडित करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यांत वीज पुरवठा खंडित होण्यामुळे वीज ग्राहकांना असुविधा होत असल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर असुविधा दुर होण्याबाबत तसेच येथील जीर्ण झालेले खांब व डी.पी. बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अलिबाग व मुरुड तालुके समुद्र किनारी व खारेपाटात वसले असल्याने त्या ठिकाणी वीजेचे लोखंडी खांब खालच्या बाजूने पूर्णपणे गंजून खराब होणे, वीज वाहिन्या गंजून खराब होणे व विद्युत डीपी नादुरुस्त होण्याचे प्रमाण इतर भागाच्या तुलनेत जास्त आहे.

(२) महापारेषण कंपनीने २२० के.व्ही. कांदळगांव उपकेंद्र दि. ३०.०५.२०१७ रोजी नियमित देखभालीकरिता सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या काळात बंद राहणार असल्याबाबत सूचित केले होते. परंतु कंपनीचे काम ऐनवेळी वाढल्यामुळे सदर उपकेंद्र संध्याकाळी ७.४३ वा. चालू करण्यात आले. त्यामुळे त्या दिवशी दिर्घ काळाकरिता वीज पुरवठा बंद राहिल्याने वीज ग्राहकांनी मुरुड येथील वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा नेला होता.

(३) पेण तालुक्यात खारेपाट भागातील माऊलीचीवाडी, वडखळ येथील ८ खांब जीर्ण झाले असून सदरचे काम देखभाल व दुरुस्ती योजना (O & M) योजनेअंतर्गत करण्याचे प्रस्तावित असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) मुरुड शहराकरिता पर्यायी उच्चदाब उपकेंद्र उपलब्ध नसल्याने पायाभूत आराखडा-२ या योजनेतून दत्तवाडी ता. मुरुड या ठिकाणी ३३/२२ के.व्ही. क्षमतेच्या उपकेंद्राचे काम पूर्ण झाले असून इनकमिंग फिडरचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच ११ के.व्ही. पाथरे उपकेंद्रामध्ये ३३ के.व्ही.ए. व २५ एम.व्ही.ए. (१००/३३) चे काम महापारेषण कंपनीमार्फत प्रगतीपथावर आहे. तसेच सदरील भागातील सडलेले वीजेचे

खांब व डीपी बदलण्याचे काम पं. दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना (DDUGJY) व एकात्मिक ऊर्जा विकास कार्यक्रम (IPDS) या योजनेअंतर्गत प्रस्तावित आहेत. तसेच अलिबाग शहराकरिता राष्ट्रीय चक्रीवादळ जोखीम उपशमन प्रकल्प (NCRMP) ही योजना प्रस्तावित असून सदर योजनेअंतर्गत संपूर्ण शहरातील उपरी तार मार्ग भूमिगत करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भडगाव (जि.जळगांव) शहरात वीजपुरवठा बंद असल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी सबस्टेशनवर मोर्चा काढल्याबाबत

**(३७) * ९१०१८ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भडगाव (जि.जळगांव) शहरात वीजपुरवठा बंद असल्याने संतप्त झालेल्या नागरिकांनी दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास सबस्टेशनवर मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज पुरवठा खंडित झाल्याने नागरिकांची खूप गैरसोय होत असून शहरात उक्त दिनांकास झालेल्या वादळी पावसामुळे परिसरातील अनेक खांब वाकून वीज ताराही तुटलेल्या आहेत त्याचबरोबर तालुक्यात गावोगावी वीज पोलवरील वीजताराही जीर्ण झाल्या असून धोकादायक बनल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तसेच प्रश्न भाग २ बाबत शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) दि. २५ मे २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० च्या दरम्यान चक्री वादळ, सुसाटयाचा वारा व वादळी पाऊस अचानक सुरु झाल्याने भडगांव शहराला वीज पुरवठा करणाऱ्या ११ के.व्ही. उच्च दाब वाहिनीचे ६ लोखंडी खांब वाकले

व सिमेंट खांब तुटून पडल्यामुळे भडगांव शहराचा विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. दोन दिवसांत विद्युत पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला.
(३) व (४) महावितरण कंपनीमार्फत भडगाव तालुक्यातील विद्युत वाहिन्यांच्या तारांची पाहणी केली असता धोकादायक असलेल्या तारा सुरळीत करण्याचे आदेश ठेकेदारास देण्यात आले. सदर बाबतीत अधिक्षक अभियंता, महावितरण जळगाव यांनी सखोल चौकशी केली असता सदर चौकशीत उपविभागीय अधिकारी, महावितरण हे दोषी आढळल्यामुळे त्याच्यांवर निलंबनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरासाठी भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामांकरीता निधी मंजूर होऊनही कामाला सुरुवात न झाल्याबाबत

**(३८) * ९१६१६ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरासाठी भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामांकरीता सुमारे १३.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा निधी मंजूर होऊनही अद्याप प्रत्यक्षात काम सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी मंजूर होऊनही कामाला सुरुवात न होण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) केंद्र पुरस्कृत एकात्मिक ऊर्जा विकास योजनेंतर्गत (IPDS) चिपळूण शहरातील भूमिगत वाहिनीच्या कामाकरिता रु.१३०.१७ लाख मंजूर करण्यात आले होते. परंतू चिपळूण शहरातील भौगोलिक परिस्थितीमुळे सदर कामे तेथे करणे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य नसल्याने त्या कामांऐवजी अन्य विद्युत विकास कामे करण्यात येणार आहेत.

(२) केंद्र शासनाच्या एकात्मिक ऊर्जा विकास योजनेअंतर्गत चिपळूण शहराकरिता एकूण रु.७०९.४२ लाख इतक्या किंमतीचा कार्यादेश दि. ०६.०१.२०१७ रोजी कंत्राटदारास प्रदान करण्यात आला असून कामे प्रगतीपथावर आहेत

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) सदर कामे माहे जुलै, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

-----------------

## नागपूर जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या बहुतांश वसतीगृहांमध्ये मुलभूत सुविधांची अनियमितता असल्याबाबत

**(३९) * ९३५२९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या १०२ वसतीगृहांपैकी बहुतांश वसतीगृहांमध्ये विविध मुलभूत सुविधेमध्ये अनियमितता आढळून आल्याची माहीती माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतीगृहाची पाहणीकरीता गेलेल्या जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांना अशुध्द पिण्याचे पाणी, हजेरी पत्रकात नोंदी न आढळणे, खोल्यांमध्ये दिवे नसणे, स्वच्छतागृहे साफ नसणे, धान्य साठ्यांच्या नोंदी नसणे, अशा विविध प्रकारच्या समस्या निदर्शनास आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याप्रकरणी चौकशी करून वसतीगृहाच्या अधिक्षकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) हे खरे नाही.तथापि नागपूर जिल्हयातील समाजकल्याण विभागाच्या १०२ वसतिगृहापैकी बहुताश वसतिगृहा मध्ये विविध मुलभूंत सुविधांमध्ये अनियमितता आढळून आल्याबाबत सन २०१६-१७ मध्ये समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयाद्वारे झालेल्या विशेष तपासणी मोहीमेदरम्यान निदर्शनास आले आहे.

(३) या बाबत तपासणी अंती अनियमितता आढळून आलेल्या १३ वसतीगृहातील सुधारणांचा आढावा घेण्यासाठी सुनावणी आयोजित करुन ९ वसतिगृह व्यवस्थापनास सुधारणा करण्यास सक्त निर्देश देऊन संधी देण्यात आली आहे. तसेच गंभीर स्वरुपाच्या अनियमितता आढळून आलेली चार वसतिगृहे बंद करण्या बाबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे शिफारस करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मोर्डे(ता. संगमेश्वर) येथे सुरु असलेल्या खडी कारखान्याबाबत**

**(४०) * ८४९३० अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मोर्डे (ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथे माहे ऑक्टोंबर, २०१५ पासून खडी कारखाना सुरु असून त्यास स्थानिक नागरिकांचा विरोध आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्प हा मोर्डे धरणाजवळ असल्याने सदर धरणाचे प्रचंड नुकसान होत आहे, तसेच सदर कारखान्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पारंपारिक शेतीवरही दुष्परिणाम झाला असून परिसरातील घरांना हादरे बसत असल्याने तेथील रहिवाश्यांना त्याचा त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकल्प बंद करण्याबाबतची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी, तहसिलदार, रत्नागिरी, पर्यावरण विभाग, रत्नागिरी, पाटबंधारे विभाग, रत्नागिरी व सरपंच, मौजे मोर्डे, रत्नागिरी यांचेकडे दिनांक ११ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अनेकदा पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील मौजे मोर्डे येथे संबंधित परवानाधारक यांनी गौण खनिज खदानीसाठी तसेच क्रशरसाठी सक्षम प्राधिकरणाकडून आवश्यक त्या परवानग्या घेऊन खडी क्रशर सुरू केल्याचे दिसून येते.

सदर खडी क्रशर बंद करण्याबाबत मौजे मोर्डे ग्रामविकास मंडळ मुंबई यांनी दि.११/१०/२०१६ रोजी तहसिलदार संगमेश्वर यांच्याकडे निवेदन दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी देवळे यांनी चौकशी केली असता, सदर खडी क्रशरमुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पारंपारिक शेतीवर परिणाम होत असल्याचे तसेच परिसरातील घरांना धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तसेच सदर खदानीची कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, रत्नागिरी यांनी तपासणी केली असता, सदर खदान ही मोर्डे धरणापासून ७५० मीटरपेक्षा जास्त अंतरावर असल्याने सदर खदानीतील उत्खननामुळे मौजे मोर्डे लघु पाटबंधारे योजना, ता. संगमेश्वर या प्रकल्पास धोका संभवत असल्याचे दिसून आले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुने कोळशावर आधारीत विद्युत निर्मिती संच बंद करण्याबाबत

**(४१) * ८७२०१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रदुषण रोखण्याच्या उद्देशाने २५ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त काळ वापरात असलेली कोळशावर आधारित विद्युत निर्मिती संच बंद करण्याचा आदेश केंद्र

सरकारने दिल्याने राज्यातील कोराडी,भुसावळ,परळी, खापरखेडा व चंद्रपूर येथील एकूण १४ वीजनिर्मिती संच बंद करावे लागणार आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीजनिर्मिती संच बंद पडल्यामुळे सुमारे ४ हजार मेगावॅट वीजनिर्मिती घटण्याची शक्यता असून दरम्यानच्या कालावधीत राज्यातील बहुसंख्य भागात तापमान वाढल्यामुळे विजेच्या मागणीमध्ये २ हजार मेगावॉटची वाढ होऊन ती १८ हजार मेगावॉटवर गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे भारनियमन करण्यात येत असल्याने शेतक-यांच्या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील वीजेची वाढती मागणी व कोळशावर आधारित बंद करण्यात येणारे १४ वीजनिर्मिती संच यामुळे मोठया प्रमाणावर वीजनिर्मिती घटण्याची शक्यता विचारात घेवून राज्य शासनाने मोठया प्रमाणावर वीजनिर्मिती होण्याच्या दृष्टीने कोणती पर्यायी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) केंद्रीय पर्यावरण, वन जलवायू परिवर्तन मंत्रालयाच्या ७ डिसेंबर, २०१५ च्या अधिसूचनेनुसार कोळशावरील आधारित औष्णिक विद्‌युत केंद्रातील SPM व SO२ उत्सर्जनाची नूतन मर्यादा निर्धारित केली आहे. त्यानुसार, ज्या औष्णिक विद्‌युत केंद्राचे ऊत्सर्जन निर्धारित केलेल्या मानांकनापेक्षा अधिक आहे त्या केंद्रामध्ये मुख्यत: SO२ उत्सर्जन नियंत्रण करण्यासाठी FGD उभारण्यासाठी पर्यायाचा अवलंबन करण्याचे निर्देशित केलेले आहे व त्याची पूर्तता डिसेंबर, २०१७ पर्यंत करण्याचे बंधनकारक आहे.

त्यानुसार ऊर्जा मंत्रालय, केंद्र सरकार अंतर्गत केंद्रीय विद्‌युत प्राधिकरणाद्‌वारे देशातील सर्व कोळशावर आधारित ऊर्जानिर्मिती केंद्राची विभागावर संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार ज्या ऊर्जा निर्मिती केंद्रातील संच उपरोक्त निर्धारित केलेल्या मानांकनाचे पालन करीत नसतील त्यांनी FGD उभारणीच्या पर्यायाचे कृती कार्यक्रम केंद्रीय विद्‌युत प्राधिकरणास सादर केल्यास, त्यांना मार्च, २०२१ पर्यंत FGD

उभारणी  व कार्यान्वयन करण्याची  परवानगी देण्यात येईल असे निर्देश देण्यात आले आहेत.
महानिर्मितीने त्यांच्या नूतन मानांकनात न बसणाऱ्या संचास FGD उभारण्याचा कृती कार्यक्रम तयार केला असून संचालक मंडळाच्या मंजुरीनंतर मार्च, २०२१ पर्यंत  संचाना FGD  उभारणीचे  उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यामुळे  महानिर्मितीचे औष्णिक विद्युत  केंद्रे बंद पडण्याची शक्यता नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिह्यात वीजेचा शॉक लागून मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(४२) *  ९३५८२  श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :**  सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे महावितरणच्या तुटलेल्या तारांमुळे वीजेचा शॉक लागून शेतात काम करणाऱ्या तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना धामोरी बुद्रुक शिवारातील गट नं.१०२ मध्ये घडल्याचे दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळूंज एमआयडीसी पोलीस ठाण्यात याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून सदर घटनेच्या तीन दिवसांपूर्वी वादळी वाऱ्याने तुटलेल्या विद्युत तारा महावितरण कंपनीकडून जोडण्यात न आल्याने ही दुर्दैवी घटना घडली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच  या जिल्ह्यातील लासूर स्टेशन येथून जवळच असलेल्या भागाठाण येथे तुटलेल्या विजेच्या तारांना स्पर्श झाल्याने एका युवतीचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ५ जून, २०१७ रोजी वा त्या  सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक ३ जून,  २०१७ रोजी सायंकाळी परिसरात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने काही झाडे उन्मळून वीज वाहिन्यांवर पडल्याने तारा तुटल्याच्या व वीजेचे पोल वाकल्याच्या घटनेकडे महावितरणच्या

कर्मचारी व अधिकारी वर्गाने दुर्लक्ष केल्यानेच दुसऱ्या दिवशी सकाळी तरुणीचा तुटलेल्या विद्युत तारांना स्पर्श झाल्याने मृत्यू ओढवल्याचे देखील खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रश्न भाग १ व ३ बाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, सदर अपघात दिनांक ०९/०६/२०१७ रोजी धामोरी बुद्रुक येथील गट नं. १०० मध्ये घडला आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय, सदर अपघात दिनांक ०४/०६/२०१७ रोजी मौजे भागाठाण ता. गंगापूर येथे घडलेला आहे.
(४) होय खरे आहे.
(५) प्रश्न भाग १ मध्ये नमूद अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, औरंगाबाद कार्यालयामार्फत दिनांक १४/०६/२०१७ रोजी करण्यात आली आहे. सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार आढळल्यामुळे दि. २०/०६/२०१७ च्या पत्रान्वये उपकार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, गंगापूर उपविभाग यांना त्यांनी कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.
प्रश्न भाग ३ मध्ये नमूद अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, औरंगाबाद कार्यालयामार्फत दिनांक ०४/०६/२०१७ रोजी करण्यात आली आहे.
सदर अपघातास महावितरण कंपनी जबाबदार आढळल्यामुळे दि. ०१/०६/२०१७ च्या पत्रान्वये उपकार्यकारी अभियंता, महावितरण कंपनी, गंगापूर उपविभाग यांना त्यांनी कारणे दाखवा नोटीस बजाविली आहे.

-----------------

## घोडेगाव (जि. पुणे) येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयमार्फत लाभार्थ्यांना शिलाई मशिन व पीठ गिरण्या देण्यात आल्या नसल्याबाबत

**(४३) * ९२९६४ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील घोडेगाव येथील आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय हे माहे एप्रिल, २०१६ पासून सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजना लाभार्थ्यांना देण्यास अकायक्षर्म ठरले असून सन २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षातील उपसा सिंचन योजनेतील ६० लाभार्थ्यांना १ कोटी ८० लाख रूपये निधी उपलब्ध होऊनसुद्धा कोणतीही कार्यवाही न झाल्याने हा निधी शासनाकडे जमा झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिलाई मशिन व पीठ गिरणीचे लाभार्थी निवड होऊन आणि या योजनेचा सहभाग म्हणून शासनाकडून १५०० ते २२०० रूपये प्रकल्प कार्यालयात जमा झालेले असतानाही १ वर्ष होऊनही लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला नाही,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त आश्रमशाळेची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा** : (१) जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात उपसा सिंचन योजनेंतर्गत पुणे जिल्हयाकरिता रु.१ कोटी ८१ लाख इतका निधी मंजूर करण्यात आला होता. तथापि, प्राथमिक सर्वेक्षणाअंती लाभार्थ्यांच्या यादीतील अनेक उणिवा, लाभार्थ्यांची अपात्रता यामुळे सदरहू निधी लगतच्या आर्थिक वर्षाखेर पर्यंत खर्च होण्याची शक्यता नसल्याने वित्त विभागाच्या शासन निर्णय दि. ०६ जून, २००८ मधील तरतूदीनुसार तो शासनास समर्पित करण्यात आला हे खरे आहे.

(२) सन २०१५-१६ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प या योजनेअंतर्गत शिलाई मशिन व पीठ गिरणींसाठी प्रत्येकी १५० लाभार्थी निवडण्यात आले होते. तथापि, ज्या पात्र लाभार्थ्यांनी स्वहिश्याची १५ % सहभाग रक्कम भरणा केलेली आहे अशा पात्र ११५ लाभार्थ्यांना शिलाई मशिन व ९७ लाभार्थ्यांना पीठ गिरणीचे वाटप करण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १३ हजारांहून अधिक शाळांमध्ये वीज जोडणी न दिल्याबाबत

**(४४) * ८५६१७ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ४४ हजार शाळा ह्या डिजिटल असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात येत असताना राज्यातील १३ हजार ८४८ शाळांमध्ये वीज जोडणीच झालेली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान युनिफाईड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशनच्या (यूडायस २०१५-१६) शासकीय अहवालात नमूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, राज्यातील वीजेचा अभाव असलेल्या शाळांना तात्काळ वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त शाळांना अद्यापपर्यंत विद्युत पुरवठा न करण्याची कारणे काय आहेत, तसेच ज्या शाळांना अद्याप वीजपुरवठा करण्यात आलेला नाही त्यांना किती कालावधीत वीज पुरवठा करण्यात येईल,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) युनिफाईड डिस्ट्रिक्ट इन्फॉर्मेशन सिस्टीम फॉर एज्युकेशनच्या (यूडायस) रिपोर्टनुसार सन २०१६-१७ पर्यंत राज्यातील एकूण १,०४,९७० शाळांपैकी ९८,६९६ शाळांमध्ये वीज जोडणी झाली असून ६,२७४ शाळांमध्ये वीज जोडणी झालेली नाही. यापैकी विद्युत सुविधा नसलेल्या शासकीय, जिल्हापरिषदा, नगरपालिका, महानगरपालिका शाळांची संख्या ५२८० असून ९९४ खाजगी शाळा आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) वीज जोडणी नसलेल्या शाळांनी नवीन वीज जोडणीसाठी विहित नमुन्यात अर्ज महावितरण कंपनीकडे सादर केल्यास त्यांना महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने पारित केलेले कृती मानके २०१४ नुसार शहरी भागासाठी १५ दिवसात व ग्रामीण भागासाठी २० दिवसात नवीन वीज जोडणी देणे बंधनकारक आहे.

-----------------

## मुरुड तालुक्यातील (जि.रायगड) संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याबाबत

**(४५) * ८६५०२ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरुड तालुक्यातील ( जि. रायगड ) संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांना गेल्या चार महिन्यापासून अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार या लाभार्थ्यांना त्वरीत अनुदान देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाड्यात देवठाणा (ता.मंठा,जि.जालना) येथील शेतक-याने बँकांकडून कर्ज मिळत नसल्यामुळे नैराश्यातून आत्महत्या केल्याबाबत

**(४६) * ९२४८७ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात देवठाणा (ता.मंठा, जि.जालना) येथील शेतक-यांने नापिकी, शेतमालाला मिळत नसलेला भाव, बँकांकडून कर्ज मिळत नसल्याच्या नैराश्यातून दिनांक ११ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी घटनास्थळी जाऊन पोलिसांनी पंचनामा केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्जबाजारी शेतक-यांना वेळीच न्याय मिळण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) शेतकरी आत्महत्या पात्र प्रकरणी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये कुटुंबीयांस रूपये १.०० लाख इतके सानुग्रह अनुदान दिले आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उस्मानाबाद व यवतमाळ या दोन जिल्हयांमध्ये पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्याअंतर्गत बळीराजा चेतना अभियान राबविण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी “छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७” राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध शाळांमध्ये अंध, अपंग, मुकबधीर विद्यार्थ्यांना शिकविणा-या विशेष शिक्षकांचे वेतन न दिल्याबाबत

**(४७) * ९१८३१ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्हयांमधील शाळांमध्ये अंध, अपंग, मुकबधीर विद्यार्थ्यांना शिकविणा-या विशेष शिक्षकांची सेवा दिनांक ७ जुलै, २०१५ पासून समाप्त करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांच्या आदेशान्वये सदर ११८५ विशेष शिक्षक व ७२ परिचारकांना पुनर्स्थापित करून त्यांचे थकीत वेतन २ महिन्यांच्या आत देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी अद्यापपर्यंत या शिक्षकांना वेतन देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर शिक्षकांना तातडीने वेतन देण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जून, २०१७ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, सेवा समाप्त करण्यात आलेल्या विशेष शिक्षक/परिचर यांच्या सेवा दिनांक ०५.०१.२०१७ च्या पत्रान्वये पुनःस्थापित करण्याचे आदेश देण्यात आले असून त्यांचे वेतन अदा करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## किन्ही, उमरी, सायखेडा, खैरगाव, वागदा, जवाहर नगर (ता.केळापूर, जि.यवतमाळ) या गावांमध्ये नवीन सिंगल फेज गावठाण फिडरची कामे निकृष्ट दर्जाची असल्याबाबत

**(४८) * ९२५२१ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्ही, उमरी, सायखेडा, खैरगाव, वागदा, जवाहर नगर (ता.केळापूर, जि.यवतमाळ) या गावांमध्ये नवीन सिंगल फेज गावठाण फिडरची सन २०१३-१४ मध्ये कामे मंजूर झाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावठाण फिडरची कामे करत असताना खांब व तारा टाकण्याची कामे ठेकेदारांनी निकृष्ट दर्जाची केली असल्याचे स्थानिक नागरिकांनी दिलेल्या तक्रारीवरुन निदर्शनास आले असून काही ठिकाणी खांब व तारा पडल्याचेही दिनांक २ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागाला सदर दुरुस्तीकरिता पुन:श्च निधी देण्यात आला असून दोन वर्षापूर्वी कामे करण्यात आलेली असतांनाही पुन:श्च निधी देण्यात आल्याने या कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत असून शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यामध्ये दोषी आढळणा-या संबधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) गावठाण वाहिनी विलगीकरण योजनेअंतर्गत पांढरकवडा विभागातील पांढरकवडा उपविभागातील, ३३ के.व्ही. उपकेंद्र पांढरकवडा येथून निघणाऱ्या ११ के.व्ही. करंजी गावठाण वाहिनीचे काम सन

२०१३-१४ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सदर वाहिनी दिनांक २२.०१.२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या वाहिनीद्वारे किन्ही, उमरी, सायखेडा, खैरगाव, वागदा, जवाहरनगर या गावांना वीज पुरवठा होतो.

(२) ११ के.व्ही. करंजी गावठाण वाहिनीचे काम कंपनीच्या मानकाप्रमाणेच करण्यात आले आहे. परंतु दिनांक २७.०५.२०१७ च्या प्रचंड वादळी वाऱ्यामुळे सदर वाहिनीचे दातपाडी या गावाजवळ सिमेंटचे ७ पोल तुटून पडले होते.

(३) सदर कंपनीला दिलेल्या निविदेतील अटीनुसार वादळी वाऱ्याने झालेल्या नुकसानीचे काम करण्याबाबत कंत्राटदार जबाबदार नसल्यामुळे सदरचे काम महावितरण कंपनीच्या देखभाल व दुरुस्ती निधीमधून करण्यात आले आहे. सदरचे नुकसान नैसर्गिक आपत्तीमुळे झाले असल्याने संबंधितांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील पायाभूत सुविधेसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(४९) * ९४१४३ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामधील पायाभूत सुविधा क्र. २ अंतर्गत शेती पंपाना वीज कनेक्शन मिळणेकरिता माहे मार्च, २०१४ नंतर ४,१५७ शेतकऱ्यांनी कोटेशन भरुनही पायाभूत आराखडा मंजूर नसल्याने व शासनाने निधी उपलब्ध करुन न दिल्याने शेतकऱ्यांना शेती पंपाकरिता नवीन जोडणी मिळाले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी उपलब्ध करुन देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा. ऊर्जामंत्री महोदय यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाबाबत व शेतकऱ्यांना शेती पंपाकरिता नवीन जोडणी मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) कोल्हापूर जिल्हयात मार्च, २०१७ अखेर ६८९४ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित होते. सन २०१७-१८ मध्ये विविध योजनांतर्गत ११०३ कृषीपंपांचे ऊर्जीकरण करण्यात आले असून मे, २०१७ अखेर ६९७४ कृषीपंप पैसे भरुन वीज जोडणीकरिता प्रलंबित असून त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) विविध योजनांतर्गत उर्वरित प्रलंबित कृषी पंपांना वीज पुरवठा करण्याचे महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कळंब (ता.कर्जत, जि.रायगड) विभागातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याबाबत

**(५०) * ९२२८० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंब (ता.कर्जत, जि.रायगड) विभागातील शासकीय आदिवासी आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय आदिवासी विकास प्रकल्प, पेण विभागाने घेतल्यामुळे सुमारे ९० आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदिवासी आश्रमशाळेत शिकत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना कर्जत तालुक्यातील अन्य आश्रमशाळेत समाविष्ट करून घेण्याचे आश्वासन शाळेच्या मुख्याध्यापकांनी पालकांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी आश्रमशाळेतील ९० विद्यार्थ्यांना तालुक्यातील अन्य आश्रमशाळेत अद्यापही प्रवेश मिळाला नसून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) सदर शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी असल्याने सदर शाळेतील विद्यार्थ्यांचे जवळच्या इतर शाळेत समायोजन करण्यांत आले आहे.

(३) सदर शाळेतील मुलांना पालकांच्या पसंतीनुसार जवळच्या जिल्हा परिषद शाळा, कळंब, शासकीय आश्रमशाळा, सासणी, अनुदानित आश्रमशाळा, लव्हाळी, जिल्हा परिषद शाळा, बांगणी या शाळेत प्रवेशित झाले आहेत. त्यामुळे सदर शाळेतील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: मुंबईत राहणाऱ्या नागरीकांना त्यांचे जातीचे दाखले मिळणेबाबत

**(५१) * ९१७८२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राहणाऱ्या नागरीकांना त्यांचे जातीचे दाखले काढावयाचे असल्यास त्यांना सन १९६७ च्या अगोदरचे पुरावे सादर करावे लागतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मुंबईत राहणाऱ्या नागरीकांना आपल्या मूळ गावी जाऊन दाखले काढावेत असे तहसिलदार कार्यालयामार्फत सांगण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ च्या मुंबई महापालिका निवडणूकीमध्ये परराज्यातील मुंबईत वास्तव्य करणाऱ्या व निवडणूक लढविण्यास इच्छुक

असणाऱ्याना मुंबईत तहसिलदार व उपजिल्हाधिकारी यांनी जातीचे नवीन प्रमाणपत्र काढून दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१७ मध्ये महापालिका निवडणुकीकरिता देण्यात आलेल्या जातीच्या दाखल्यांबाबत जात पडताळणी समितीकडे सदर दाखले अवैध असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे यासाठी सन २००१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्याअंतर्गत पारित २०१२ च्या नियमान्वये कार्यवाही केली जाते. इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या अर्जदारांना जातीचे प्रमाणपत्र मिळविणे व त्याची पडताळणी करण्यासाठी दि.१३/१०/१९६७ हा मानीव दिनांक महाराष्ट्रातील वास्तव्य निश्चितीसाठी व जातीचे प्रमाणपत्राकरिता विहित केला आहे.

(२) व (३) जातीचे प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करणे यासाठी सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्याअंतर्गत पारित २०१२ नियमांतील नियम क्र.३ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांना शासनाने अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ब) अन्वये राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, ज्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याला पदनिर्देशित किंवा नियुक्त केले असेल त्या संबंधित क्षेत्रातील मानीव दिनांकास कायमस्वरूपी रहिवासी असणाऱ्या अर्जदारास जातीचे प्रमाणपत्र देण्यात येईल अशी तरतूद आहे.

सन २००१ चा अधिनियम व त्याअंतर्गत पारित २०१२ च्या नियमांतील तरतुदीनुसार जात प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) होय, हे खरे आहे.

सन २०१७ मध्ये मुंबई महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या अर्जदारांचे जात प्रमाणपत्र प्रस्तावावर निवडणुकीत त्यांचे समोर पराभूत झालेले व अन्य नागरिकांकडून हरकती प्राप्त झाल्या आहेत.

(५) याबाबत समित्यांकडे प्राप्त सर्व प्रकरणांचे समिती अधिनस्त दक्षता पथकामार्फत अहवाल प्राप्त झाल्यवर अशा प्रकरणांवर संबंधित समित्या विहित कालावधीमध्ये निर्णय घेत आहेत.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक वसाहतीतील कचरा उचलण्याचे आदेश हरीतलवादाने औद्योगिक विकास मंडळास दिल्याबाबत

**(५२) * ९३४५४ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक वसाहतीतील सम्प (सांडपाणी जमा करण्यासाठी वापरण्यात येणारी) ३ मधून काढण्यात आलेला सुमारे ४०० मॅट्रीक टन कचरा उचलण्याचे आदेश राष्ट्रीय हरित लवादाने औद्योगिक विकास मंडळास दिनांक ३० मे,२०१७ रोजी वा त्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार तारापूर औद्योगिक विकास मंडळ (वसाहतीतील) घनकचरा उचलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे आहे.

(२) मा.राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार सम्प क्र.३ मधून निघालेला संपुर्ण रासायनिक गाळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महा मंडळाने मे.मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा या मान्यता प्राप्त प्रक्रिया केंद्राकडे पोहोचविला असून, आता जागेवर कोणताही गाळ शिल्लक नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पांढरकवडा (जि.यवतमाळ) येथील मंजूर असलेली एमआयडीसी सुरू करण्याबाबत

**(५३) * ९३५१२ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पांढरकवडा, जि.यवतमाळ येथील मंजूर असलेली एमआयडीसी सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी(आर्णी) यांनी दिनांक १४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.जिल्हाधिकारी,यवतमाळ यांना निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू एमआयडीसी सुरू झाल्यास स्थानिकांना रोजगार उपलब्ध होऊन उद्योगवाढीस चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू एमआयडीसी मंजूर असूनही अद्याप सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, एमआयडीसी सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) (४) व (५) मौजे पाटणबोरी येथील जमीनी कब्रस्तान, गुरांचा दवाखाना, जिल्हा परिषद शाळेचे ठिकाण, स्मशानभुमि इत्यादीसाठी वापर सुरु आहे. तसेच मौजे केळापूर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरित केलेली जमीन वन खात्याची असल्याने वन विभागाने त्या जमीनीवर वनेतर कामे करण्यास प्रतिबंध केलेला आहे. तथापि ८३९.०९ हे. आर इतके खाजगी क्षेत्र भुसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## वसमत तालुक्यातील (जि.हिंगोली) कुरुंदा शिवारात बनावट दारू बनवण्याचा कारखाना सुरु असल्याबाबत

**(५४) * ९२५०२ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसमत तालुक्यातील (जि.हिंगोली) कुरुंदा शिवारात बनावट दारू बनवण्याचा कारखाना असून या कारखान्यामध्ये मोठ्या प्रमाणावर बनावट दारू बनवली जात असून याबाबत तक्रार करुनही प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) तसेच हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री होत असून तक्रार करुनही प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर जिल्ह्यात बनावट दारूचे व्यवहार बंद करण्याबाबत शासनाने तातडीने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. या प्रकरणी कोणतीही तक्रार उत्पादन शुल्क विभागास प्राप्त झालेली नाही. मात्र उत्पादन शुल्क विभागाकडून दि.४ मे, २०१७ रोजी कुरुंदा शिवारातील बनावट दारू बनविण्याचा कारखान्यावर छापा टाकण्यात आला आहे. सदर प्रकरणी महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून ३ आरोपींना मुद्देमालासह अटक करण्यात आली आहे. हिंगोली उत्पादन शुल्क कार्यालयाने अवैध दारूची निर्मिती / विक्री / वाहतूक करणाऱ्यांविरूध्द एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ या कालावधीत एकूण ७० गुन्हे नोंदविले असून याप्रकरणी ३३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अवैध दारू धंद्याविरुध्द विभागाकडून तसेच भरारी पथकाकडून छापे मोहिम राबवून वेळोवेळी कारवाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर परिसरातील सिव्हील लाईन येथील हॉटेल हेरिटेजमध्ये अवैध दारू विक्री होत असल्याबाबत

**(५५) * ८५५४२ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गापासून ५०० मीटरच्या परिसरात मद्यविक्री बंद करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतरही महामार्गापासून ५०० मीटरच्या आत येणा-या नागपूर परिसरातील सिव्हील लाईन येथील हॉटेल हेरिटेजमध्ये माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान अवैध मद्यविक्री केली जात असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याची माहिती मिळताच राज्य उत्पादन शुल्क विभागाने कारवाई करुन मोठया प्रमाणात दारू साठा जप्त केला असल्याचे दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे** : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय,

तथापी ही कारवाई दि.०५/०५/२०१७ रोजी करण्यात आली असून संबंधिताविरूध्द राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ अन्वये गु.रजि.क्र. १३४/२०१७ नोंदविलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात जमिनी संपादित करुन उद्योगधंदे सुरु न केल्याबाबत

**(५६) * ८५१७४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथे महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने सन २०१४ पासून औद्योगिक क्षेत्रासाठी एकूण १० लाख एकर जमीन संपादित केली असून तेथे अद्याप एकही उद्योग सुरु झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रात "किया मोटर्स" या कोरियन कंपनीने राज्यातील सदर प्रकल्प बंद करुन आता हा उद्योग आंध्रप्रदेशात सुरु करणार असल्याचे दिनांक ९ मे,२०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, तसेच ह्युंडाई मोटर्सने आपला उद्योग आंध्रप्रदेशात सुरु करणार असल्याचे माहे एप्रिल,२०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर किया मोटर्स कंपनीचा प्रकल्प राज्यात कार्यान्वित झाल्यास तेथील ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रानिक्स क्लस्टरमधील ५० पेक्षा अधिक उद्योगांना काम मिळून सुमारे २५ ते २० हजार रोजगार उपलब्ध होईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हे उद्योग महाराष्ट्राबाहेर जाण्याची कारणे काय आहेत, तसेच अद्याप एकही उद्योग सुरू न झाल्याने शेतकऱ्यांकडून घेतलेल्या जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर साठी शेंद्रा व बिडकीन (औरंगाबाद) येथे ३८८० हेक्टर जमीन संपादित केली आहे. शेंद्रा येथे २५ प्लॉटचे वाटप झाले असून एका कंपनीचे उत्पादन सुरु आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

किया मोटर्स सोबत महाराष्ट्रामध्ये गुंतवणूकीसाठी चर्चा सुरु होती. महाराष्ट्रात त्यांचा कोणताही प्रकल्प सुरु नाही. तसेच हुंडाई मोटार्सचा उद्योग आंध्रप्रदेश येथे सुरु असल्याची बाब शासनास अवगत नाही.

(४) व (५) गुंतवणूकीबाबत इतर बहुराष्ट्रीय कंपन्याशी चर्चा सुरु आहे. शेंद्रा येथे पायाभुत सुविधाची कामे सुरु आहेत. २५ उद्योजकांना भुखंडाची वाटप झाले असून एका कंपनीचे उत्पादन सुरु आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हयातील मान्यता प्राप्त कामांना खनिज विकास निधीअंतर्गत निधी मिळण्याबाबत

**(५७) * ९२३६४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खनिज विकास निधी अंतर्गत नागपूर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ नागपूर या विकास यंत्रनेच्या मौजा आदासा (ता.कळमेश्वर) गणेश टेकडी येथे वृक्ष लागवड आणि सुरक्षा भिंत व इतर तत्सम कामे करणे या करीता ८५.९७ लक्ष किमंतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देवून माहे जुलै, २०१६ ला ८.२० लक्ष रूपयांचा निधीही वितरित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उर्वरित निधी अद्यापही प्राप्त न झाल्यामुळे उक्त कामे प्रलंबित असल्याने सदर निधी तातडीने वितरित करावा अशी मागणी करणारे पत्र महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांनी मा.जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे पाठविले असल्याची माहिती दिंनाक २ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी त्वरीत मिळण्याबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे, महाराष्ट्र खनिज विकास निधी अंतर्गत नागपूर जिल्हयातील मौजा आदासा, गणेश टेकडी, ता. कळमेश्वर येथील सुरक्षा भिंत व इतर तत्सम कामे, तसेच वृक्ष लागवड इ. कामांसाठी शासन निर्णय, दिनांक १५.०६.२०१६ अन्वये रू.८५.९७ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.
(२) व (३) महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांनी नागपूर जिल्हयाकरिता खनिज विकास निधी अंतर्गत निधी निरंक असल्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांना दिनांक ०३.०६.२०१७ च्या पत्रान्वये कळविले होते. तथापि, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडाळाने दिनांक ०९.०६.२०१७ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार ज्या जिल्हयाचा निधी संपुष्टात आला आहे, त्या जिल्हयाकरिता अवितरीत निधी रू.११.१३ कोटी वितरीत करण्यास मान्यता देण्याबाबत विनंती केलेली होती. त्यानुषंगाने महामंडळाकडे अवितरीत निधीचे प्राधान्यक्रम ठरवून वितरीत करण्याचे निर्देश शासनाच्या दिनांक २१.०६.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आलेले होते. त्यानुसार खनिज विकास निधी अंतर्गत प्रशासकीय मान्यताप्राप्त कामाचे प्राप्त देयकाची रू.३०,४५,७०७/- इतकी रक्कम RTGS द्वारे दिनांक ०७.०७.२०१७ रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, नागपूर यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र खनिज विकास निधी अधिनियम, २००१ सद्य:स्थितीत निरसित करण्यात आला असून त्याऐवजी खाण व खनिजे अधिनियम, २०१५ च्या तरतुदींप्रमाणे प्रत्येक जिल्हयात जिल्हा खनिज प्रतिष्ठान स्थापन

करण्यात आले आहे. खनिज विकास निधी अंतर्गत ज्या विकास कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती त्यांचे करिता अतिरिक्त निधीची आवश्यकता असून सदर निधी पुरवणी मागणीद्वारे प्राप्त करून देण्यासाठी प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लालीबाई माध्यमिक आश्रमशाळा,जिवती व स्व.वसंतराव प्राथमिक आश्रमशाळा चंदनवाही, (ता.राजूरा, जि.चंद्रपूर) या आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याबाबत

**(५८) * ९३०८५ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती, जि.चंद्रपूर येथील आश्रमशाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी राजूरा(चंद्रपूर) यांनी दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. पालकमंत्री महोदय (जि.चंद्रपूर) यांना तसेच दिनांक ५ जून,१७ रोजी वा त्यासुमारास मा. आयुक्त विजाभज, इमाव व विमा प्रवर्ग कल्याण, म.रा. पुणे यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रतापसिंग शिक्षण संस्था पिपर्डी ता. कोरपना जि. चंद्रपूरव्दारा संचालित आदिवासी आश्रमशाळांची उच्चस्तरीय चौकशी करण्याबाबत निवेदन मा.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य् विभाग, मंत्रालय, मुंबई यांना तसेच मा.पालकमंत्री महोदय (जि. चंद्रपूर) यांना दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले होते, हे ही खेर आहे काय,

(३) असल्यास, उक्त शिक्षण संस्थेव्दारे संचालित लालीबाई माध्यमिक आश्रमशाळा, जिवती व स्व्.वसंतराव प्राथमिक आश्रमशाळा चंदनवाही ता. राजूरा या दोन्ही आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांकरीता निवासी व्यवस्था नसणे, दुकानाच्या गाळ्यांमध्ये वर्ग भरविण्यात येणे, निवासाची स्वतंत्र व्यवस्था नसणे, स्वच्छतागृह निकषाप्रमाणे नसणे, स्वयंपाकाची खोली धोकादायक स्थितीत असणे, अशा अनेक गंभिर त्रुटी सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण विभाग, चंद्रपूर यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०१५ आणि ०२ डिसेंबर, २०१५

रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये मा. संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण म.रा.पुणे यांना सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग चंद्रपूर, यांनी त्रुटीचा अहवाल सादर केला असूनही त्याची पुर्तता न करता शासन उक्त दोन्ही आश्रमशांळाना अनेक वर्षापासून अनुदान देत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून त्याअनुषंगाने उक्त दोन्ही आश्रमशांळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) होय. अंशत: खरे आहे.

जिवती ता. राजुरा जि. चंद्रपूर व चंदनवाही ता.राजूरा या दोन्ही आश्रमशाळांमध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटींच्या अनुषंगाने प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, अमरावती यांचेतर्फे (क्रॉस व्हेरिफिकेशन) उलट तपासणी करण्यात येत आहे. सदर तपासणीचा अहवाल प्राप्त होताच सदर प्रकरणी नियमानुसार पुढील आवश्यकती कार्यवाही करण्याची बाब विभागाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील बारवी धरण प्रकल्पग्रस्ताच्या स्थलांतरणात झालेला गैरव्यवहार

**(५९) * ८९२८६ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि. ठाणे) तालुक्यातील बारवी धरण प्रकल्पगस्तांच्या गतवर्षी पाणी भरतीमुळे झालेल्या स्थलांतराच्या खर्चामध्ये तसेच गावाच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद्नुसार बारवी धरण प्रकल्पगस्तांच्या स्थलांतराच्या खर्चामध्ये तसेच गावठाण कामामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संबंधित अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे नाही

तथापि, मा. लोकप्रतिनिधीनी दिनांक ०४/०६/२०१७ रोजी महामंडळास दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने तसेच ग्रामस्थानी दर्शविल्याप्रमाणे सरसकट सर्व घरे मोजण्यात आली असली तरी घराच्या केलेल्या मुल्यांकनाच्या रकमेवर प्राप्त झालेल्या हरकती व निवेदने लक्षात घेऊन घराच्या मुल्यांकनाबाबत फेर पडताळणी करुन नंतरच निधी वाटप करण्याचे महामंडळाने ठरविले आहे. महामंडळातर्फे गावठाणातील विकासकामे E-Tendering पध्दतीचा अवंलब करुन कमी दराच्या निविदांना देकार देऊन करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रकरणी संबंधित अधिकाऱ्याकडून अहवाल मागविण्यात आलेला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मालवण शहरातील (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) दांडी, मोरेश्वरवाडी, रेवणकरवाडी, जाधववाडी, मेठा, चिवलाब्रीच आदी भागात कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत

**(६०) * ८८२५२ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण शहरातील (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) दांडी, मोरेश्वरवाडी, रेवणकरवाडी, जाधववाडी, मेठा, चिवलाब्रीच आदी भागात कमी दाबाचा

वीजपुरवठा होत असून वारंवार खंडित होणा-या वीजपुरवठयामुळे तेथील ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याने मागील ३ वर्षांपासून तेथील वीजधारकांकडून सातत्याने अभियंता, वीजवितरण कंपनी मालवण, कार्यकारी अभियंता, वीजवितरण कंपनी, कणकवली, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा उर्जामंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वायरी भूतनाथ तसेच मालवण शहरात वाढत्या हॉटेल व्यवसायामुळे येथील १०० केबी वीज ट्रान्सफॉर्मरची क्षमता कमी पडत असल्याने ती २०० केबी करण्यात यावी,अशी मागणीही वीजधारकांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी वीज अभियत्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) कमी दाबाच्या वीजपुरवठयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीचे निवेदन महावितरण कार्यालय, मालवण यांच्याकडे दि. ०९.०६.२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) स्थानिक वीज ग्राहकांकडून तसेच लोक प्रतिनिधीकडून सदरची मागणी करण्यात आली आहे.

(३) दांडी, मोरेश्वर वाडी, रेवणकर वाडी, जाधववाडी, मेठा, चिवलाब्रीच याभागातील सिंगल फेज वाहिनीचे थ्री फेज वाहिनीमध्ये रुपातंर करण्याचे काम महावितरण कंपनीकडून जिल्हा नियोजन समितीअतंर्गत सन २०१७-१८ करिता प्रस्तावित आहे. तसेच वायरी भूतनाथ व मालवण शहरात वाढत्या हॉटेल व्यवसायामुळे येथील १०० केव्हीए ट्रान्सफॉर्मरची क्षमता २०० केव्हीए करण्याचे काम महावितरण कंपनीमार्फत प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रांजणगांव (जि. औरंगाबाद) येथे महावितरणच्या तुटलेल्या तारांमुळे वीजेचा शॉक लागून मृत्यूच्या घटनांमध्ये झालेली वाढ

**(६१) * ९३५८६ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगांव (जि.औरंगाबाद) येथे गच्चीवर कपडे वाळत घालत असताना अति उच्चदाबाच्या विद्युत तारेचा शॉक लागून विवाहित महिलेचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक ७ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास रोजी निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रांजणगावमधीलअनेक भागात लटकणा-या तारा आहेत तसेच नागरी वस्तीतील ११ के.व्ही. अतिउच्चदाबाच्या विद्युत वाहिन्या यामुळे मागील वर्षी एक ३० वर्षीय इसम गंभीररित्या जखमी झाला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनांची चौकशी केली आहे काय, सदर घटना रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच याप्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सदर प्राणांतिक अपघात दि. ६/६/२०१७ रोजी घडला आहे. अपघातग्रस्त महिला दि. ६/६/२०१७ रोजी सकाळी साधारण १०:३० ते ११:०० वा. च्या दरम्यान कपडे धुवून त्यातील ओली बेडशीट गच्चीवरील उच्चदाब वाहिनीच्या लगत असलेल्या संरक्षक भिंतीवर वाळायला टाकत असताना ती बेशुध्द पडली व त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले.

(२) दि. ११/०२/२०१६ रोजी गणेश नगर, जोगेश्वरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे घराचे बांधकामासाठी खड्डे खोदून लोखंडी कॉलम उभारणीचे काम करीत असताना सदर लोखंडी कॉलम वरच्या साईडला झुकून ते अनावधानाने ११ के.व्ही उपरीतारमार्गावर पडले व उपरीतारमार्ग विद्युत प्रवाहित असल्यामुळे व सदर लोखंडी कॉलम अपघातग्रस्त व्यक्ती यांनी हातात धरलेला असल्याने त्यांचा प्राणांतिक अपघात झाल्याचे आढळून आले.

सदरील अपघात हे गावातील लोंबकळलेल्या तारांमुळे झालेले नसून त्याभागातील लोकांनी घरे बांधताना घराच्या छतापासून वाहिनीचे अंतर सुरक्षित न ठेवल्यामुळे झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) उपरोक्त क्र. १ व २ येथील नमूद अपघाताप्रकरणी विद्युत निरीक्षक, औरंगाबाद कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. क्र. १ मधील अपघाताप्रकरणी मृत महिलेच्या शवविच्छेदनाच्या पुढील रासायनिक व व्हिसेरा पृथकरण अहवाल प्राप्त झालेला नसल्याने मृत्यूचे कारण अद्याप निश्चित झालेले नाही. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर अपघातास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

क्र. २ येथील अपघात प्रकरणी अपघातग्रस्त व्यक्ती स्वत: जबाबदार असल्याचे आढळून आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरूर (जि.पुणे) तालुक्यातील ढाब्यावर व इतर ठिकाणी बेकायदा दारू विक्री सुरू असल्याबाबत

**(६२) * ९३००० श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील दारू दुकाने बंद करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर शिरूर तालुक्यातील (जि.पुणे) धाब्यांवर अवैध दारू व बेकायदा दारू विक्री दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून मोठ्या प्रमाणात सुरु असून शिक्रापूर, शिरूर व रांजणगाव गणपती या तीनही पोलीस स्टेशन हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिरूर तालुक्यातून अनेक प्रमुख राज्य मार्ग, राष्ट्रीय मार्ग जात असूनही या मार्गाच्या कडेला ५०० मीटर अंतराच्या आतमध्ये सुमारे साडेचारशे अवैध दारू विक्रेते असूनही अद्याप तेथे दारु विक्री सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार अवैध दारू धंदे बंद करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे
तथापि अवैध धंद्यावर वेळोवेळी कारवाई कारण्यात येत आहे.
(२) हे खरे नाही.
अवैध धंद्यावर वेळोवेळी कारवाई कारण्यात येत आहे.
(३) अ) राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत शिरुर तालुक्यातील शिरुर, शिक्रापूर, रांजणगांव या तीन गावाच्या हद्दीमध्ये दि. ०१ एप्रिल, २०१७ ते १८ जुलै, २०१७ या कालावधीत अवैध मद्य विक्रीच्या धंद्यांवर २५ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत रु.१३,९०,७७६/- इतकी आहे.
ब) पोलीस विभागामार्फत शिक्रापूर, रांजणगांव व शिरुर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दि. ०१ एप्रिल ते २७ जुलै, २०१७ या कालावधीत एकूण ९८ केसेस करुन ११५ आरोपीवर गुन्हे दाखल केले आहेत. तसेच उक्त परिसरात बेकायदेशीर दारु विक्री होणार नाही याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
क) गुन्हा अन्वेषणाची परिणामात्मक कारवाई व्हावी व मद्याची अवैध विक्री होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घारोडे पोड आणि कोडपाखिंडी पोड (ता. कळंब) आदिवासी कोलाम समाजवस्ती असलेल्या पोडावर जाण्यासाठी रस्ता नसल्याबाबत

**(६३) * ९४१६९ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासींमधील कोलाम या अतिमागास जमातीची वस्ती असलेले कळंब तालुक्यातील घारोडेपोड आणि कोडपाखिंडी पोडा (जि.यवतमाळ) येथील नागरिकांना येजा करण्याकरिता रस्ता नसल्याचे दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमातीचे ब-याच वर्षांपासून पोडावर वास्तव्य आहे परंतु पोडाला मुख्य रस्त्याला जोडणारा रस्ता नसल्याने आदिवासी कोलाम समाजातील लोकांचा तालुक्यातील शासकीय कार्यालयासोबत संपर्क होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, उक्त समस्यांची दखल घेऊन शासनाने सदर रस्त्याचे बांधकाम त्वरित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

कोडपाखिंड ही कोलाम वस्ती मुख्य रस्त्यापासून पक्क्या डांबरी रस्त्याने जोडलेली आहे. मात्र घारोडया पोड येथे पक्क्या रस्त्याचे काम वनजमीनीमुळे प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

(३) घारोडया पोड कोलाम वस्तीसाठी वनजमिनीतील ०.४५० कि.मी. लांबीसाठी वनजमिन उपलब्ध करुन देणेसाठी मुख्य वनसंरक्षक वन विभाग, यवतमाळ यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. वन विभागाच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साखर कारखान्यांना सहवीज निर्मिती प्रकल्पातून वीजनिर्मिती करिता सन २०१७-१८ या वर्षाकरिता ६ रुपये ६५ पैसे दर कायम ठेवणेबाबत

**(६४) * ९४१८७ श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतापासून ऊर्जा निर्मितीच्या नवीन धोरणानुसार राज्यात २००० मेगावॅट क्षमतेचे सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३-१४ मध्ये कार्यान्वित होणाऱ्या प्रकल्पांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये महावितरणकडून ६ रुपये ६५ पैसे प्रति युनिट दर मिळत असताना आता महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक मंडळ यांचे दिनांक २८ एप्रिल २०१७ चे पत्रानुसार २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी महावितरणकडून ६ रुपये ३६ पैसे प्रति युनिट दर मिळणार आहे असे कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक युनिटला २९ पैसे प्रमाणे कमी दर मिळणार असल्याने प्रत्येक कारखान्याला अंदाजे १ ते १.५ कोटी रुपये तोटा सहन करावा लागणार असून साखर कारखान्यांना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरिता मागीलप्रमाणे ६ रुपये ६५ पैसे दर कायम ठेवणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.

(२) होय. महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांचे दिनांक २८ एप्रिल, २०१७ चे आदेशानुसार सन २०१३-१४ मध्ये कार्यान्वित होणा-या प्रकल्पांना सन २०१७-१८ मध्ये ६ रुपये ३६ पैसे प्रति युनिट दर ठरविला आहे.

(३) दिनांक ३०.५.२०१७ रोजी मा.मंत्री (ऊर्जा) यांना यासंबंधी निवेदन प्राप्त झालेले आहे.

(४) राज्य विद्युत नियामक आयोग यांना वीज दर निश्चितीचे सर्व अधिकार आहेत. त्यांचेकडूनच त्या-त्या वर्षासाठी वीज दर निश्चित करण्यात येतात. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील मरोळ औद्योगिक वसाहतीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडपट्टीधारकांना भाडे व कायमस्वरूपी सदनिकेचा ताबा देण्यास होत असलेला विलंब

**(६५) * ९४०८२ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (पूर्व) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मरोळ औद्योगिक वसाहतीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना पूर्ण होण्यास विलंब लागत असून विकासकास ७ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१० पासून विकासकाकडून प्रतिमहा रु. ७५ हजार इतक्या कमी रकमेचा दंड आकारण्यात येत आहे व सदर दंड आजपर्यंत विकासकाने भरलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेतील पात्र झोपडपट्टीधारकांना गेली २ वर्षे विकासकाकडून भाडे व घराचा ताबा मिळत नसून भाडे देण्याचे आदेश महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने देऊनही भाडे देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने सदर भाडे देण्याबाबत व कायमस्वरूपी सदनिकेचा ताबा देण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

करारनाम्यातील तरतुदीनुसार विकासकाकडून दरमहा रुपये ७५०००/- व दिनांक ०१/०५/२०१० ते ३०/०४/२०१९ पर्यंत वाढीव कालावधीसाठी एकूण रुपये ८१.०० लक्ष वसूल करण्यात आले आहेत.

(४) व (५) हे खरे नाही.

विकासकाने मागील २ वर्षात ४४७ झोपडीधारकांना भाडयापोटी रुपये ९.५७ कोटी वितरित केले आहेत. तसेच उर्वरित झोपडीधारकांना भाडयाचे धनादेश विकासकाकडून देणेबाबतची प्रक्रिया सुरु आहे.

एकूण पात्र ५०९० झोपडीधारकापैकी ३८२१ झोपडीधारकाना सदनिकांचे वाटप करण्यात आलेले आहे. ८१८ सदनिकांचे बांधकाम सुरु असून उर्वरित ४५१ सदनिकांचे बांधकाम प्रस्तावित आहे.

-----------------

## किराटगाव (ता.जि.पालघर) येथील खदानपाडा-बोरशेती या रस्त्याची दुरावस्था झाली असल्याबाबत

**(६६) * ८९८३८ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किराटगाव (ता.जि.पालघर) येथील खदानपाडा-बोरशेती या जोडरस्त्याच्या कामासाठी सुमारे १८ लाख ७६ हजार ६४५ रुपये खर्च करूनही रस्त्याची दुरावस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) त्यानुसार दोषी अधिकारी व ठेकेदार यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर रस्त्याची दुरावस्था दूर करण्याबाबत शासनाने त्वरित कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) होय हे खरे आहे,

सन २०१३-१४ मध्ये किराट खदानपाडा ते बोरशेती जोडरस्त्याचे काम मंजूर करण्यांत आले होते. सदर रस्ता माहे जून, २०१७ च्या अतिवृष्टी मध्ये वाहून गेला असल्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू कार्यालयातील अधिकाऱ्यांनी माहे जूलै, २०१७ मध्ये केलेल्या पाहणीत निदर्शनास आले आहे.

(३) या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत प्रकल्प अधिकारी, डहाणू व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना कळविण्यांत आले आहे. तेसच रस्ता अतिवृष्टीमुळे वाहून गेला असल्याने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, डहाणू यांनी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पालघर यांना सदर रस्त्याची त्वरित दुरुस्ती करुन घेण्याबाबत कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सास्ती व कोलगाव (ता.राजुरा,जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचायतीने भंजगपूर खुली कोळसा खाण व धोपटाळा भूमिगत खाण बंद करण्याबाबत

**(६७) * ९३१०७ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सास्ती व कोलगाव (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील ग्रामपंचयतीने दिनांक १ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास ग्रामसभेचा ठराव घेवून या दोन्ही ग्रामपंचायती अंतर्गत येणारे भंजगपूर खुली कोळसा खाण व धोपटाळा भूमिगत खाण सात दिवसात बंद करण्याचा ठराव पारित केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंजगपूर आणि धोपटाळा कोळसाखाणीमुळे उक्त दोन्ही ग्रामपंचायत हद्दीत मोठ्या प्रमाणात जल व वायु प्रदूषण, रत्त्यांची दूरावस्था, घरांना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त दोन्ही ग्रामपंयतीने ग्रामसभेत कोण कोणते ठराव मंजूर केले आहेत व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) सास्ती व कोलगांव (ता. राजूरा जि. चंद्रपूर) ग्रामपंचायतीने दिनांक १ मे, २०१७ वा त्यासुमारास ग्रामसभेचा ठराव घेवून या दोन्ही ग्रामपंचायती अंतर्गत येणारे भंजगपूर खुली कोळसा खाण व धोपटाळा भूमिगत खाण सात दिवसाचे आंत बंद करण्याचा ठराव पारित केला आहे. तथापि, वेस्टर्न कोल लि. यांचे अहवालानुसार सदर दोन्ही खाणी बंद आहेत.

(२) ते (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.